रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २३५
www.ramprahar.com
बुधवार, १३ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
‘भाजप जनतेला दिलेला शब्द पूर्ण करतो’/३
पनवेल स्टेशन परिसरातून सराईत गुन्हेगार ताब्यात/६
जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत ओढांगी संघ विजेता/८

## ‘काँग्रेसच्या अनेक नेत्यांचा होणार भाजपमध्ये प्रवेश’

**मुंबई :** एकीकडे काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा मंगळवारी (दि.१२)



नंदुरबारमध्ये दाखल झाली, तर दुसरीकडे नंदुरबारचे माजी पालकमंत्री आणि काँग्रेस नेते पद्माकर वळवी भाजपच्या वाटेवर असून त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी मोठा दावा केला आहे. राहुल गांधींनी वारंवार ओबीसींचा अपमान केला आहे. म्हणून ओबीसी समाज राहुल गांधींवर नाराज आहे. राहुल गांधींची यात्रा जसजशी मुंबईतील शिवाजी पार्कजवळ येईल, तसतसे काँग्रेस नेते पक्ष सोडतील. आमच्याकडे लिस्ट आली आहे. काँग्रेस नेते पद्माकर वळवी यांनी माझी भेट घेतली आहे. नंदुरबारमध्ये राहुल गांधी असताना त्यांचे नेते मला भेटायला येतात यातून कळतं काँग्रेसमध्ये काय सुरू आहे. काँग्रेस कमजोर झाली आहे, असे बावनकुळे म्हणाले.



## विविध पक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून होत असलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन अनेक पक्षांचे नेते विकासाचे ‘कमळ’ हाती घेत आहेत. त्यानुसार भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यशैलीवर प्रभावित होऊन तसेच कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत यांच्या नेतृत्वाखाली कर्जतमधील विविध पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि.१२) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, महिला मोर्चा अध्यक्ष नम्रता कांदळगावकर, कर्जत विधानसभा विस्तारक हेमंत नांदे, उपसरपंच सुप्रिया भगत, जिल्हा परिषद विभागीय उपाध्यक्ष विनोद भगत, दिनेश राठोड आदी उपस्थित होते.



या वेळी कर्जत उमरोली येथील शेकापचे वॉर्ड अध्यक्ष रामदास शेलार, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष वैभव भगत, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस रवींद्र चव्हाण, शेकापचे मनीष ठाणगे, चिंचवली ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच जोत्स्ना भगत, पुरोगामी युवक संघटनेचे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष राजेश नाईक, शेकाप कार्यकर्ते सुरज भगत, चरणदास भगत यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांकडून स्वागत करण्यात आले.

# रेल्वेला आधुनिक बनवून कानाकोपऱ्यात पोहचवणार

## पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन; विविध प्रकल्पांचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

नवनवीन योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्यांचा विकास होत असून आपण विकसित भारताच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहोत. आज ८५ हजार कोटींहून अधिकचे प्रकल्पांचे भूमिपूजन आणि लोकार्पण होत असून रेल्वेला आधुनिक बनवून देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवणार असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि.१२) केले.

पंतप्रधान मोदींच्या हस्ते दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे अहमदाबाद-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसच्या शुभारंभासह रेल्वेच्या विविध उपक्रमांची पायाभरणी आणि राष्ट्राला लोकार्पण करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी मुंबई सेंट्रल स्थानकावर राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते.



या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०२४ या वर्षात सुमारे ११ लाख कोटींहून अधिक योजनांचे भूमिपूजन अथवा उद्घाटन झाले असून विकासाची ही गती कमी होऊ दिली जाणार नाही. मागील काही वर्षांत रेल्वे अपघातांचे प्रमाण कमी झाले व विजेवर चालणाऱ्या रेल्वेची संख्या वाढली आहे. वंदे भारत एक्स्प्रेसची संख्या वाढून विस्तारदेखील होत आहे. रेल्वेस्थानकांचा कायापालट होत आहे. भारतातील सेमी हायस्पीड रेल्वेची मागणी इतर देशांत वाढून भारतातील रेल्वेच्या कारखान्यांना अधिक काम मिळेल. एकता मॉलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार असून तरुणांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

जीवनवाहिनी ठरलेल्या रेल्वेच्या देशभर पसरलेल्या जाळ्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात जगातील सर्वांत मोठा ऐतिहासिक बदल होत आहे. देशात दररोज १५ किमीचे नवीन रेल्वे ट्रॅक तयार होत आहेत. रेल्वेगाडीप्रमाणेच देशाच्या विकासाची गाडी वेगाने धावत आहे, असे सांगून मुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले.

केंद्रीय मंत्री राणे यांनी जगाच्या प्रगतीत भारताचा मोठा वाटा असल्याचे नमूद करून २०४७पर्यंत भारत विकसित राष्ट्र होईल, असा विश्वास व्यक्त केला.

मंत्री लोढा यांनी रेल्वेमार्फत सुरू होत असलेल्या विविध उपक्रमांचा मुंबई आणि महाराष्ट्राला लाभ होणार असल्याचे सांगितले.

### उलवे नोडमध्ये एकता मॉल उभारणार

केंद्र सरकारने प्रत्येक राज्यात एकता मॉल स्थापन करण्याची योजना जाहीर केली आहे. त्यानुसार महाराष्ट्रात नवी मुंबईतील उलवे नोड येथे एकता मॉल उभारण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी दिली. राष्ट्रीय एकात्मता, मेक इन इंडिया, जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) संकल्पनेला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण कारागिरांना त्यांची उत्पादने विकण्यास मदत करण्यासाठी हा मॉल उपयुक्त ठरणार आहे. सिडकोला यासाठी अंमलबजावणी एजन्सी म्हणून नेमण्यात आले.

## वसंत मोरे यांचा मनसेला रामराम!

**पुणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील नेते वसंत मोरे यांनी पक्षाला अखेरचा जय महाराष्ट्र केला आहे. त्यानंतर पत्रकार परिषद घेत पुढील भूमिका दोन ते तीन दिवसांत मांडेन, असे जाहीर केले. ‘मी एकनिष्ठ राहिलो, पण माझ्या सहनशक्तीचा कडेलोट झाला. त्यामुळे सगळ्या पदांचा राजीनामा दिला आहे. मी परतीचे दोर कापले आहेत. सामान्य कार्यकर्त्यांशी बोललो, पण नेत्यांचा फोन घेतला नाही’ हे बोलताना वसंत मोरेंना अश्रू अनावर झाले.

## मराठा आरक्षणाला तातडीच्या स्थगितीस हायकोर्टाचा नकार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतल्यानंतर या आरक्षणाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी त्यांच्या पत्नी अ‍ॅड. जयश्री पाटील यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती, मात्र मराठा आरक्षणाला तातडीने स्थगिती देण्यास हायकोर्टाने मंगळवारी (दि.१२) झालेल्या सुनावणीत नकार दिला आहे तसेच सदावर्ते यांच्या याचिकेबाबत पुढील दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करावे, असे आदेशही कोर्टाने राज्य सरकारला दिले आहेत.

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण विधेयक काही दिवसांपूर्वी घेण्यात आलेल्या विशेष अधिवेशनादरम्यान सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आले. मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षणासाठी घेतलेला हा निर्णय कायद्याच्या कसोटीवर टिकणारा असल्याचे त्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले होते, मात्र सरकारच्या या निर्णयाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान कोर्टाने तातडीने मराठा आरक्षणाला स्थगिती देण्यास नकार दिल्याने राज्य सरकारला दिलासा मिळाला आहे.

## निवडक

### गुजरातमध्ये ड्रग्सचा साठा जप्त, सहा पाकड्यांना अटक

**पोरबंदर :** भारतीय तटरक्षक दल, गुजरात



दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि अमली पदार्थविरोधी दल (एनसीबी) यांनी अरबी समुद्रात एका बोटीवर केलेल्या संयुक्त कारवाईत ४८० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी सहा पाकिस्तानी नागरिकांना पकडण्यात आले असून सर्वांना सध्या पोरबंदरमध्ये ठेवण्यात आले आहे.

### नायब सिंह सैनी आता हरियाणाचे नवे मुख्यमंत्री

**चंदिगड :** हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल



खट्टर आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने मंगळवारी (दि.१२) राजीनामा दिल्यानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष नायब सिंह सैनी यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. खट्टर यांनी राज्यपाल बंडारू दत्तात्रेय यांच्याकडे राजीनामा दिल्याने ते लोकसभा निवडणूक लढविणार असल्याची अटकळ बांधली जात आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते साताऱ्यात पुस्तकाचे प्रकाशन

**सातारा : रामप्रहर वृत्त**

कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. अण्णा काका पाटील व डॉ. अरुणकुमार जयराम सकटे यांनी संपादित केलेल्या एम्प्लॉयमेंट अ‍ॅण्ड इन्कम जनरेशन थ्रो मनरेगा या पुस्तकाचे प्रकाशन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.१२) करण्यात आले. सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये पुस्तक प्रकाशन सोहळा झाला.

‘रयत’चे सचिव विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या

### मान्यवरांची उपस्थिती

समारंभास व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे, सहसचिव प्राचार्य डॉ. ज्ञानदेव मस्के, बी.एन. पवार, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रोजगार हमी योजना आणि ग्रामीण विकासाच्या दिशा याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी असणारे विकास देशमुख यांनी रोजगार हमी योजनेमुळे महाराष्ट्रातील कुशल कामगारांना रोजगार व उत्पन्नाची निर्मिती झाल्याचे सांगितले. दुष्काळग्रस्त भागांमध्ये वरदान ठरलेल्या या रोजगार हमी योजनेद्वारे महाराष्ट्राने भारताला ग्रामीण रोजगाराचे एक प्रतिमान दिल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजीराव पाटील यांनी, सूत्रसंचालन डॉ. संदीप किर्दत यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. रोशन शेख यांनी मानले. या कार्यक्रमास प्रशासकीय सेवक, प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



## पनवेलमध्ये ग्राम परिक्रमा यात्रेतून शेतकऱ्यांशी संवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून ग्राम परिक्रमा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. भाजप किसन मोर्चाच्या वतीने आयोजित या यात्रेत शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात येणार आहे. त्या अंतर्गत सोमवारी (दि.११) पनवेल विधानसभा मतदारसंघातील शिवकर, नेरे, वाकडी, वावंजे, कानपोली, वलप या गावातील शेतकऱ्यांशी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

### भाजप किसान मोर्चाचा उपक्रम

भाजप किसान मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार चाहर यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र भाजप किसान मोर्चाच्या वतीने ग्राम परिक्रमा यात्रा अभियान राबविले जात आहे. मोदी सरकारने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री फसल बिमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिचाई योजना, इलेक्ट्रॉनिक नॅशनल अ‍ॅग्रीकल्चर मार्केट, कृषी पायाभूत सुविधा निधी, प्रधानमंत्री किसान संपदा योजना, राष्ट्रीय गोकुळ मिशन, आयुष्यमान भारत योजना, किसान क्रेडिट कार्ड, पीएम किसान रेल, जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री जनधन योजना यांसारख्या शेतकरी हिताच्या राबविलेल्या आश्वासक योजनांची माहिती देण्यासाठी हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

पनवेल मतदारसंघामध्ये किसान मोर्चाच्या वतीने शिवकर, नेरे, वाकडी, वावंजे, कानपोली, वलप या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या घरी भेट देत त्यांना केंद्र आणि राज्याच्या योजनांची माहिती देण्यात आली. या वेळी गाई आणि ट्रॅक्टरची पूजा करण्यात आली तसेच शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आणि कडधान्य पिकविण्याचे आवाहन करणार करण्यात आले. राज्य शासनाच्या वतीने वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते कानपोली येथील शेतकरी सज्जन गोवर्धन पवार यांना नुकताच देण्यात आला होता. त्याबद्दल त्यांचा या ग्राम परिक्रमा यात्रेदरम्यान मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

ग्राम परिक्रमा यात्रेत भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवकर येथे सरपंच आनंद ढवळे, **(पान २ वर..)**



## ओवळे येथे बैलगाडा शर्यतींचा थरार

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल :** महाशिवरात्री उत्सवानिमित्त आणि सिद्धेश नंदराजशेठ मुंगाजी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आमदार हिंद केसरी पनवेल, उरण आणि सरपंच हिंद केसरी ओवळे या छकड्याच्या बिनजोड जंगी शर्यतीचे आयोजन मंगळवारी (दि.१२) करण्यात आले होते. पनवेल तालुक्यातील ओवळे येथील गावदेवी मैदानात रंगलेल्या या बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी उद्योजक नंदराजशेठ मुंगाजी, ओवळे सरपंच रूपेश गायकवाड, माजी सरपंच अमित मुंगाजी, दापोलीचे माजी सरपंच गजाजन पाटील, सदस्य सदन डाऊर, जनार्दन पाटील, मिथुन जितेकर, ऋषभ म्हात्रे, अमर जितेकर, रोशन जितेकर, गजानन जितेकर, राजकुमार जितेकर, विष्णू घोपकर, भगिरथ जितेकर, ध्रुव पाटील, मेघनाथ म्हात्रे, रोशन म्हात्रे, राकेश गायकवाड, प्रदीप म्हात्रे आदी उपस्थित होते.

## मुंबईत इमारतीची परांची कोसळून तीन जण ठार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या बोरीवलीमधील सोनी वाडी परिसरात बांधकाम सुरू असलेल्या एका इमारतीची परांची कोसळून तीन जण ठार, तर एक जण जखमी झाला आहे. ही दुर्घटना मंगळवारी (दि.१२) दुपारी घडली.

मृतांमध्ये मनोरंजन समाज (४२), शंकर वैद्य (२५), पियुष हरदार (३८) यांचा समावेश आहे, तर सुशील गुप्ता (३५) गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर कांदिवलीतील शताब्दी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

# पोलादपूर लघु पाटबंधारे योजनेसाठी भूसंपादनाचा प्रश्न तत्काळ मार्गी लावा

## मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड यांचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यील कोतवाल येथील प्रलंबित लघु पाटबंधारे योजनेसाठी भूसंपादन करताना शेजारील गावांच्या आधारे योग्य दर देण्याचे निर्देश मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड यांनी दिले.

मंत्रालयामध्ये कोतवाल (ता. पोलादपूर) लघु पाटबंधारे योजनेबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या वेळी मंत्री राठोड बोलत होते, बैठकीस आमदार प्रवीण दरेकर, मृद व जल संधारण विभागाचे सचिव सुनील चव्हाण, सहसचिव सुनील काळे, रायगड जिल्हा जलसंधारण अधिकारी अण्णा कदम उपस्थित होते.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाद्वारे लघु पाटबंधारे योजनेस मौ. कोतवाल या ठिकाणी ३० ऑगस्ट २०११ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, परंतु भूसंपादन करताना स्थानिक शेतकऱ्यांना अधिक दर मिळावा, अशी मागणी आहे. या मागणीमुळे हे काम १३ वर्षे प्रलंबित आहे. कोतवाल लघु पाटबंधारे योजनेसाठी आवश्यक २९.६० हे. क्षेत्राच्या भूसंपादनचा प्रस्ताव जिल्हाधिकारी अलिबाग, रायगड यांना सादर करून संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आलेली आहे. प्रकल्प पूर्तीनंतर १८८७.१६ स.घ.मी. पाणीसाठा तयार होऊन १०५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

सद्य:स्थितीत कोतवाल बुद्रूकसाठी व कोतवाल खुर्दसाठी भूसंपादनाचे प्रती हेक्टर ठरवण्यात आलेले हे दर शेतकऱ्यांना अमान्य असून जास्तीचा दर मिळावा, अशी मागणी शासनाकडे केली होती. प्रलंबित योजना मार्गी लागावी, यासाठी मंत्री श्री. राठोड यांनी भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत शेजारील गावांना भूसंपादनासाठी देण्यात आलेला दराच्या आधारे दर देऊन प्रकल्प मार्गी लावण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# मालमत्ता कराच्या वसुलीसाठी ११ पथके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्ती पूर्व नोटीसा दिल्यानंतर आता मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला आहे. मंगळवारी (दि. १२) चारही प्रभागातील ११ वसुली पथकांच्या माध्यमातून सलग दुसऱ्या दिवशी एक कोटींहून अधिक थकित कर वसूल करण्यात आला आहे.

दरम्यान, आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेप्रमाणे जप्तीपुर्व नोटीसानंतर सात दिवसांचा कालावधी पूर्ण होऊनही मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना वॉरंट नोटीसा बजावण्याच्या कामास वेग आला आहे. मंगळवारी वसुली पथकांच्या माध्यमातून खारघरमध्ये जप्तीपूर्व नोटीसा दिलेल्या पाच थकीत मालमत्ताधारकांवरती अटकावणी कारवाई करण्यास गेले असता, चार थकीत मालमत्ता करधारकांनी आपला २० लाखांचा थकीत कर भरल्याने त्यांच्यावरील अटकावणी कारवाई स्थगित करण्यात आली.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे, परंतु आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या, अशा थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी करअधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून चारही प्रभागातून सलग दुसऱ्या दिवशी एक कोटींहून अधिक मलमत्ता कर वसूल करण्यात आला आहे. या आर्थिक वर्षामध्ये सुमारे २७८ कोटींचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे.

दरम्यान, मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने तसेच नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये केले जात आहे. या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून मालमत्ता कराच्या भरण्यामध्ये वाढ होताना दिसत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात ३लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत. तसेच ऑनलाईन आणि विविध पच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड' तयार केले आहे.

## नवी मुंबई महापालिकेला मिळणार ७१ शिक्षणसेवक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या शाळेतील प्राथमिक विभागाला भासणारी शिक्षकांची कमतरता भरून काढण्यासाठी शासनाकडून लवकरच ७१ शिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शासनाने यापूर्वीच २०२२ मध्ये पवित्र पोर्टलमार्फत शिक्षणसेवक या पदासाठी भरती प्रक्रिया राबवली होती. यात ७१ शिक्षक उमेदवारांना नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागाकडे पाठवण्यात आले आहे. महापालिका शिक्षण विभागाच्या माध्यमातून नुकतीच या उमेदवारांची कागदपत्रे जमा करून घेऊन त्यांची तपासणी करण्यात आली आहे. कागदपत्र पडताळणी करून पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी घोषित करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांना नियुक्तीपत्र देण्यात येणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली.

या शिक्षकांना १६ हजार रुपये मानधन देण्यात येणार असून यामध्ये खर्चाचा भाग ५० टक्के शासन ५० महापालिका करणार आहे.



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त गणेश शेटे, सामान्य प्रशासन विभागप्रमुख दशरथ भंडारी, आस्थापना विभागप्रमुख नामदेव पिचड, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

## जबरी चोरी करून मारहाण करणाऱ्या आरोपींना अटक



**पनवेल :** शहर पोलीस ठाणे हद्दीत साई बाबा मंदिरजवळ फिर्यादी दुकानांत काम करत असताना अज्ञात व्यक्तींनी त्यांना खुर्चीने मारहाण करून शिवीगाळ करून गल्ल्यातील १३,५०० रुपये रोख रक्कम जबरीने चोरी केले. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

गुन्ह्याच्या तपासामध्ये घटनास्थळावरील प्राप्त सीसीटीव्ही फुटेजवरून हा गुन्हा साहिल शंकर धोत्रे (वय १९, रा. भिंगारी) व प्रथम प्रसाद जाधव (वय २०, रा. नवनाथ नगर झोपडपट्टी) यांनी केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपींचा तांत्रिक व गुप्त बातमीदार यांच्यामार्फत शोध घेतला असता ते बस स्टँड परिसरात वाढदिवस साजरा करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तत्काळ या ठिकाणी साफळा रचून आरोपींना अटक केली आहे.

## मूकबधिर विद्यार्थ्यांसमवेत सुरेश पाटील यांचा वाढदिवस



**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते, सुरेश पाटील यांनी त्यांचा वाढदिवस मूकबधिर विद्यार्थ्यांसमवेत पंढरपूर येथे साजरा केला.

भारतीय मजदूर संघाचे त्रिवार्षिक अधिवेशन पंढरपूर येथे आयोजित केले होते. या वेळी सुरेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांनी पांडुरंगाचे दर्शन घेऊन पंढरपूर येथील वै.रखुमाबई भीमराव शिंदे या मूकबधिर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप व रोख रक्कम देणगी म्हणून दिली. सुरेश पाटील हे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, या शाळेचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष असून ते या विद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी वही, पेन देऊन विद्यार्थ्यांचा वाढदिवस शाळेत साजरा करतात.

या कार्यक्रमास रयत सेवक संघाचे समन्वयक श्री नुरा शेख, डी.पी. सोनवणे, मधुकर पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

## डोलवी ग्रामपंचायतीतर्फे महिला मेळावा आणि हळदीकुंकू समारंभ

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील डोलवी ग्रामपंचायततर्फे सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त महिला मेळावा व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.



या मेळाव्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, पेणच्या माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, मा. नगरसेविका ज्योती म्हात्रे, शर्मिला पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मनीषा म्हात्रे, खारपाडा ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच रश्मी भगत, गडब काराव ग्रामपंचायतीच्या सरपंच मानसी पाटील, तनवी पाटील तसेच डोलवी येथील महिला कीर्तनकार भगीरथीताई पाटील या उपस्थित होत्या.

जागतिक स्त्री दिनानिमित्त सगळीकडे महिला जन जागृतीचे कार्यक्रम होत आहेत, तसेच सावित्रीबाई फुले पुण्यतिथी निमित्त ग्रामपंचायत समितीतर्फे महिला मेळावा आयोजन केल्याबद्दल निलिमा पाटील यांनी सरपंच परशुराम म्हात्रे, उपसरपंच रोहन म्हात्रे, व सर्व सदस्य यांचे विशेष आभार मानले. तसेच यापूर्वी सावित्रीबाईंनी घेतलेल्या पुढाकारामुळेच महिला सर्वच क्षेत्रात मग ते शिक्षण असो वा राजकीय किंवा इतर सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत याचे श्रेय सावित्रीबाईंना जाते असे नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले. तसेच महिलांना बचत करून कुटुंब सांभाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला. तर डॉ. मनीषा म्हात्रे यांनी महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. शर्मिला पाटील यांनी सर्व महिलांना शुभेच्छा धन्यवाद दिले. भागीरथी पाटील यांनी वीर जिजामाता, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी मोलाची मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रतीक्षा म्हात्रे, आरती मात्रे, पूजा म्हात्रे, मनस्वीनी पाटील यांनी विशेष मेहनत घेतली. शेवटी सरपंच परशुराम म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले.

पान १ वरुन

### पनवेलमध्ये ग्राम परिक्रमा यात्रेतून शेतकऱ्यांशी संवाद

किसान मोर्चाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सागर सांगडे, हरिश्चंद्र घरत, शिवकर ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रांजल पाटील, सदस्य रितू पाटील, मोनिका पोपेटा, संतोष मते, मनीषा ढवळे, सुरेखा टोपले, रवींद्र ढवळे, मंगेश ढवळे, रेश्मा पाटील, गोटीराम ढवळे, आंबो ढवळे, गोपाळ पाटील, तुकाराम तुपे, शालिक पाटील, एल.एन पाटील, बबन ढवळे, संतोष ढवळे, राजकुमार ढवळे, जनार्दन चौधरी, हरिश्चंद्र घरत, वसंत ढवळे, सागर ढवळे, धरती पाटील; नेरे येथे सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच वंदना रोडपलकर, सदस्य राम पाटील, दिनेश मानकामे, शैलेश जाधव, माजी उपसरपंच नीलिमा पाटील, कल्पना वाघे, ॲड. मनीषा गायकर, सविता चोरघे, अमित गवते, सुनील पाटील, गोटीराम म्हात्रे, अंबो रोडपालकर, माया म्हात्रे, भरत काकडे, किशोर खारके, निलेश पाटील, विद्याधर चोरघे, बाळकृष्ण म्हात्रे, नेरे शक्ती केंद्र प्रमुख रोशन पाटील; वावंजे येथे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, ग्रामपंचायत सदस्य नासिर शेख, सचिन पाटील, उल्हास पाटील, धर्मनाथ सांगडे, गणपत पाटील, संजय जोगले, गजानन पाटील, नारायण मढवी; कानपोली आणि वपल येथे बाळकृष्ण पाटील, मंजुळा पाटील, ग्रामपंचायत सदस्य मधुकर पाटील, आंबो पाटील, कचरू साळुंखे, निर्वती पाटील, सजन पवार, आत्माराम पाटील, अरुण पाटील, संजोग पाटील, प्रभाकर पाटील, वसंत पाटील, नवनाथ खुटारकर, संतोष पाटील; वाकडी येथे माजी सरपंच नरेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## इनरव्हील क्लबकडून बाल वैज्ञानिकांचे कौतुक



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गोठीवली शाळा क्र.४६ मधील भावी शास्त्रज्ञाना प्रेरित करण्यासाठी इनरविल क्लब ऐरोली व शाळा क्र. ४६ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ११) बाल शास्त्रज्ञाच्या संशोधन प्रयोगाचे प्रदर्शन गोठीवली शाळेत भरविण्यात आले होते.

इनरविलच्या अध्यक्ष वैशाली व्यास, डॉ. अलका कांबळे व इतर पदाधिकाऱ्यांनी शाळा मुख्याध्यापिका व शिक्षण विस्तार अधिकारी कल्पना गोसावी यांच्यासोबत प्रदर्शनाची पाहणी केली व पुरस्कार प्राप्त प्रयोग व नवीन बाल वैज्ञानिकांना प्रोत्साहन देत त्यांचे मनोबल वाढवले.

या वेळी रेणुका मॅडम, पत्रकार अनिलकुमार उबाळे, शाळेतील शिक्षिका, स्वच्छतादूत व विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रीय पातळीवर शाळा क्रं.४६ने आपला ठसा उमटवला असून आंतरराष्ट्रीय विज्ञान स्पर्धेत बाजी मारण्याचा संकल्प येथील विद्यार्थ्यांनी केला आहे. मी अब्दुल कलम, मी कल्पना चावला ह्या संकल्पनेतून बाल वैज्ञानिक शोध मोहीम इनरविल क्लब फाउंडेशनने सुरू केली असल्याचे व्यास यांनी सांगितले.

## पनवेलमध्ये कराओके स्टार गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम आणि टॅलेंट हंट कमिटीतर्फे पनवेल मध्ये प्रथमच लायन कराओके स्टार ही कराओके गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा चार गटात प्राथमिक आणि अंतिम अशा दोन फेऱ्यांमध्ये घेण्यात आल्या. या स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला.

पनवेल, पेण, अलिबाग, खोपोली, माणगाव येथून स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन माजी प्रांतपाल मुकेश तनेजा आणि मोहिनी तनेजा यांचे हस्ते झाले तर अंतिम फेरीत प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल ए.के. शर्मा आणि विशेष अतिथी म्हणून द्वितीय प्रांतपाल संजीव सूर्यवंशी, रिजन चेअरमन मिलिंद पाटील उपस्थित होते. डिस्ट्रिक्ट पदाधिकारी प्रवीण सरनाईक, नमिता मिश्रा, आलोक मिश्रा, रमाकांत म्हात्रे, संगीता म्हात्रे, के.एस. पाटील आदी उपस्थित होते. अंतिम फेरीसाठी चार गटातील ४६ स्पर्धकांमध्ये झाली.

यात वयोगट १८ ते ४०मध्ये प्रथम क्रमांक तेजश्री पवार, ४१ ते ६० वयोगटात प्रथम क्रमांक कांचन देशमुख, द्वितीय क्रमांक संजय चाचड, तृतीय क्रमांक प्रसाद विटकर, ६१च्या वरील वयोगटात प्रथम क्रमांक दत्तात्रय ढोले, द्वितीय क्रमांक वर्षा जोशी, लायन सभासद प्रथम क्रमांक देवेंद्र पाटणे, अविनाश राऊत यांनी पटकावला. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून सतीश मोरे आणि रेणुका दलाल यांनी काम पाहिले तर अंतिम फेरीसाठी विवेक भागवत आणि श्रीकांत जोशी यांनी परीक्षण केले.

या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी क्लबच्या अध्यक्षा स्वाती गोडसे आणि टॅलेंट हंट कमिटीचे सुयोग पेंडसे यांना सरगम क्लबच्या मानदा पंडित, संविदा पाटकर, अलकेश शहा, संजय गोडसे, मधुरा राजीव, सुरभी पेंडसे यांनी मोलाचे सहकार्य केले.

या वेळी सरगम क्लबचे प्रेमेंद्र बहिरा, धवल शहा, सुनील देशपांडे, जयेश मणियार, प्रदीप भट्टाचार्य आणि पनवेल मधील रसिक संगीत प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# भाजप जनतेला दिलेला शब्द पूर्ण करतो

## जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचे प्रतिपादन

## गुळसुंदे जि.प. विभागात विविध विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जी विकास कामे करण्याचे शब्द जनतेला दिले ते पूर्ण करण्याचे काम आपल्या नेतृत्वाने केले असल्याचे गौरवोद्‌गार भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी उरण मतदारसंघातील विविध विकासकामांच्या शुभारंभावेळी केले तसेच पनवेल आणि उरण मतदार संघामध्ये आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी हे जनतेला भेडसवणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी काम करत आहेत. त्यामुळे आगामी सर्व निवडणुकांमध्ये आपल्या परिसरातील मतदार हा भाजपच्या पाठीशी राहील यासाठी प्रयत्नशील रहावे, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले.



भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पनवेल आणि उरण मतदारसंघामध्ये विकासाची कामे वेगाने होत आहेत. त्यानुसार आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीमधून अनेक विकासाच्या कामांचा शुभारंभ मंगळवारी (दि. १२) झाला. यामध्ये एक कोटी रुपयांच्या निधीमधून गुळसुंदे जिल्हा परिषद विभागामधील आकुळवाडी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे भूमिपूजन, ७० लाख रुपयांच्या निधीमधून तुराडे ठाकूर वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामाचे भूमिपूजन, १५ लाख रुपयांच्या निधीमधून भोकरपाडा येथे नवीन रस्त्याच्या कामाचे, १५ लाख रुपयांच्या निधीमधून भोकरपाडा येथे खुला रंगमंच बांधण्याच्या कामचे भूमिपूजन, ५० लाख रुपयांच्या निधीमधून खानावळे आदिवासीवाडी रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामाचे भूमिपूजन तसेच पाच लाख रुपयांच्या निधीमधून भोकरपाडा येथील हिरानंदानी सेल्स ऑफिसपासून ते क्रिकेट मैदानापर्यंतच्या करण्यात आलेल्या रस्ता डांबरीकरणाच्या कामाचे लोकार्पण, आठ लाख ५० हजार रुपयांच्या निधीमधून भोकरपाडा येथे बांधण्यात आलेल्या नवीन अंगणवाडीचे लोकार्पण तसेच भोकरपाडा येथे ग्रामपंचायत फंडातून नवीन महिला सभागृह बांधण्यात आले अशून या कामाचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले.

या कामांच्या शुभारंभावेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अविनाश गातडे, सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील माळी, पोयंजे पंचायत समितीचे अध्यक्ष प्रवीण ठाकूर, माजी उपसभापती देविदास पाटील, गणेश आगिवले, बंडू शिद, महेंद्र पाटील, सचिन दुर्गे, मंगेश लबडे, राकेश ठाकूर, राजेश पाटील, समीर मुजावर, संभाजी पाटील, सुनील दळवी, जगन पाटील, हरिश बांडे, महादेव कांबळे, पी.डी. पाटील, चंद्रकांत भोईर, काका गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी भाजप नेते जयदास चोरगे यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.

# बेकायदा व्यावसायिकांमुळे वाहतूक कोंडी

**पनवेल : वार्ताहर**

नेहमीच गर्दीचे ठिकाण असलेल्या पनवेल शहरासह ग्रामीण भागातून अनेक जण आपल्या विविध शासकीय कामासाठी पनवेल तहसीलदार कार्यालय आणि पनवेल शहर पोलीस ठाण्यात येत असतात, परंतु या ठिकाणी बेकायदेशीर रित्या उभारण्यात आलेल्या व्यवसायिकांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

अश्या बेकायदेशीर व्यवसायिकांवर कारवाईची करण्याची मागणी येथील स्थानिक रहिवाश्यांनी पनवेल महापालिका अतिक्रमण विभाग आणि पनवेल वाहतूक शाखेकडे केली आहे. या ठिकाणी बेकायदेशीररित्या परप्रांतीयांनी नारळ पाणी विक्री, उसाचा रस चरखा, कलिंगडाची विक्री व इतर व्यवसाय भर रस्त्यात सुरू केल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडीचा फटका येथील शालेय विद्यार्थ्यांना सुद्धा बसत आहेत. अनेक वेळा बेकायदेशोरपणे दुचाकी व चार चाकी वाहनेसुद्धा येथे मनमानी पद्धतीने उभी करण्यात येत आहेत. तरी अश्या वाहनांवर वाहतूक शाखेने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.



**पनवेल : माजी नगरसेवक डी. आर. भोईर यांना वाढदिवसानिमित्त माजी नगरसेवक तथा भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, शहर चिटणीस रूपेश नागवेकर, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई आणि केतन खुटले यांनी शुभेच्छा दिल्या.**

# नवीन खासगी चारचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नवीन खासगी चारचाकी वाहनांसाठी एमएच ४६ सीआर या नवीन मालिका लवकरच सुरू होत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी कळविले आहे.

या मालिकेतील आकर्षक/अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९च्या नियम ५७अ नुसार विहित केलेले आकर्षक नोंदणी क्रमांक व त्यासाठीचे शुल्क याबाबतची सविस्तर माहिती, पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.

एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास उक्त नमूद तरतूदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी जाहीर लिलाव केला जाईल, याची नोंद घेण्यात यावी, असे पनवेलचे प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांनी पनवेल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील उरण, पनवेल, कर्जत व खालापूर तालुक्यातील नागरिकांना एका प्रसिध्दी पत्रकान्वये आवाहन केले आहे.



**खारघरमधील भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हा सचिव शुभ पाटील यांनी अयोध्येतील श्री राम मंदिराला भेट दिली. या वेळी सुरज पाटील, रोशन पाटील, तेजस डोंगरे आदी सोबत होते.**

# म्हातवली ग्रामपंचायतीतर्फे व्यावसायिक प्रशिक्षण शिबिर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील म्हातवली ग्रामपंचायत हद्‌तील ९० महिलांना म्हातवली ग्रामपंचायत वतीने मोफत व्यवसायिक प्रशिक्षण घेण्यात आले.

म्हातवली ग्रामपंचायत सरपंच रीना शिरधनकर, उपसरपंच निलिमा थळी, ग्रामसेविका ज्योती फोपेरकर, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आदी उपस्थित होते. उपसरपंच निलिमा थळी, ग्रामसेविका ज्योती फोपेरकर, मानदेशीच्या प्रकल्प समन्वयिका ज्योत्सना सिरकर, पियुषा यादव यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रशिस्त पत्रक देण्यात आले.

नथ मेकिंग, फ्लॉवर मेकिंग व कोल्ड्रिंक मेकिंग प्रशिक्षण तीन दिवस देण्यांत आले. मानदेशी फाऊंडेशन च्या सहकार्याने हे शिबिर घेण्यात आले. मानदेशीच्या प्रकल्प समन्वयिका ज्योत्सना सिरकर, सहकारी कर्मचारी पियुषा यादव यांनी प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले.






## संपादकीय

# आईला स्थान स्वागतार्हच

सरकारी दस्तावेजांमध्ये आईचे नाव निव्वळ वेगळ्या रकान्यामध्ये न नोंदवता उमेदवाराचे नाव, आईचे नाव, नंतर वडिलांचे नाव व शेवटी आडनाव अशी नाव लिहिण्याची नवी पद्धत बंधनकारक करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आईच्या नावाला स्वत:च्या संपूर्ण नावात स्थान देण्याबाबत व हे नाव वडिलांच्याही नावाआधी घेतले जाण्याबाबत विशेषत: तरुण पिढीची अनुकूलता दिसत होतीच. सरकारच्या निर्णयामुळे हा स्वागतार्ह बदल रूढ होण्यास नक्कीच वेगाने मदत होईल.

**आपल्याकडच्या वर्तमान समाजात बाळाचे पहिले नाव ठेवतानाच बराच खल होतो. त्यासाठी परंपरांनुसार पत्रिका, जन्मअक्षर वगैरेंसोबतच नावांच्या याद्या असलेली पुस्तके, नातेवाईक-मित्रमंडळी इतकेच नव्हे; तर समाजमाध्यमांवर चौकशा करून नावाची निवड केली जाते. हा एवढा खटाटोप कशासाठी, तर त्याचे उत्तर साधेसोपे आहे. नाव ही आपली पहिली ओळख असते. अनेक ठिकाणी आपण प्रत्यक्षात पोहचण्यापूर्वी आपले नाव पोहचते व आपल्याविषयी संबंधितांच्या मनात काहीएक 'इमेज' सकारात्मक अथवा नकारात्मक निर्माण होते. अलीकडे तर पालक पार मोठेपणी आपले मूल परदेशात स्थायिक झाल्यास तेथील 'ओळखी'च्या दृष्टीने सोयीची अशी भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवर परिचयाची व स्वागतार्ह वाटतील अशी नावे ठेवणेही पसंत करतात. काही मंडळी तर त्याही पुढे जाऊन नावाच्या रूढ स्पेलिंगमध्येही कथित तज्ज्ञांना विचारून अक्षरे कमी-अधिक करुन घेतात. नावाबाबतचा हा आग्रहीपणा पहिल्या नावापाशीच संपत नाही. आडनाव लावावे का, वा फक्त आईवडिलांची नावे लावावीत? आडनाव फक्त वडिलांचेच का, आईचे का नाही आदी मुद्यांवरूनही अनेक जण अगदी कोर्टाची पायरीही चढतात असे दिसते. बहुतेकांच्या जडणघडणीत आईचा वाटा मोलाचा असतो. कित्येकदा वडिलांपेक्षाही काकणभर अधिकच, पण अगदी आतापर्यंत आईच्या या योगदानाला सामाजिक जीवनात उघड उल्लेखाची जागा मिळाली नव्हती. गेली काही वर्षे विद्यापीठ स्तरावर प्रवेश अर्ज तसेच हजेरीपटावर विद्यार्थ्यांचे आडनाव, नाव, वडिलांचे नाव व शेवटी आईचे नाव अशा पद्धतीने लिहिले जाते. निव्वळ येथेच नव्हे तर समाजमाध्यमांवरही अनेक जण आपल्या नावासोबत आईचे नाव लिहिण्याबाबत आग्रही भूमिका घेताना दिसत होते. आता तर महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत सरकारी दस्तावेजांमध्ये आईच्या नावाचा समावेश करणे बंधनकारक केले आहे. यापुढे सरकारी दस्तावेजांमध्ये आईचे नाव निव्वळ वेगळ्या रकान्यात न लिहिता, उमेदवाराचे नाव, आईचे नाव, नंतर वडिलांचे नाव आणि शेवटी आडनाव अशा स्वरूपात नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्याच्या चौथ्या महिला धोरणामध्ये सरकारी दस्तावेजांमध्ये आईचे नाव वडिलांच्या नावाआधी लावण्याचे नमूद करण्यात आले होते. आईचे प्रत्येकाच्या आयुष्यातील स्थान लक्षात घेता कागदपत्रांमध्येही तिचे नाव अग्रस्थानी रहावे अशी भूमिका यामागे आहे. १ मे २०२४ रोजी व त्यानंतर जन्मलेल्या सर्व बालकांच्या नावांची नोंद बालकाचे नाव, आईचे नाव, नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपात सर्व शैक्षणिक कागदपत्रे, महसुली दस्तावेज, विविध परीक्षांचे अर्ज आदींमध्ये करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्र सरकारकडूनही याबाबतीत आदेश निघाल्यानंतर जन्म-मृत्यू नोंदवहीतही याच स्वरूपात नावे नोंदवली जाणार आहेत. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे अशा तऱ्हेने नाव लिहिण्याच्या पद्धतीचे तरुण पिढीकडून स्वागत होत असून जुन्या पद्धतीने नाव लिहित वाढलेल्या वयोगटातील मंडळीही या बदलास अनुकूलच आहेत.**

# आता अपराध्यांना वाटेल कायद्याचे भय



**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेलमध्ये उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उद्‌घाटन नुकतेच करण्यात आले. अशा प्रकारचे कक्ष संपूर्ण राज्यात उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे आरोप सिद्ध होण्याचे प्रमाण वाढेल व अपराध्यांना कायद्याचे भय वाटेल. याचा परिणाम राज्यातील गुन्हेगारीला आळा बसण्यात होईल असे म्हणायला हरकत नाही.

महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात दोन हजार २९५ एफआयआर दाखल झाले असल्याची माहिती एनसीआयआरबीच्या आकडेवारीवरून दिसत आहे. महिलांसाठी सुरक्षित असलेल्या मायानगरी मुंबईत दिल्लीपेक्षा महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांचे प्रमाण सात हजार ९८२ने कमी असले तरी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) तपास केलेल्या गुन्ह्यांत शिक्षा होण्याचे प्रमाण घटत असल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात एकीकडे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न होत असताना महत्त्वाची तपास यंत्रणा असलेल्या सीआयडीने केलेल्या तपासात आरोपी मोठ्या प्रमाणात निर्दोष सुटत असल्याचे दिसून आले आहे.

गुन्ह्यातील मुद्देमाल हा पोलीस ठाण्यातील मुद्देमाल कक्षामध्ये ठेवला जात असतो, परंतु पोलीस ठाण्यात पुरेशी जागा नसणे, मुद्देमाल खराब होणे, ओला होणे या सारख्या अनेक समस्यांमुळे मुद्देमाल योग्य पद्धतीने न्यायालयासमक्ष सादर करण्यात अडचणी निर्माण होत असत. त्याचा फायदा मिळून गुन्हेगार निर्दोष सुटत . पण आता हा सर्व मुद्देमाल पोलीस ठाण्यातून स्वतंत्र ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ठेवल्यास जागेची, वेळेची व मनुष्यबळाची बचत होईलच, शिवाय आरोप सिद्ध होण्याचे प्रमाणही वाढले आणि अपराध्यांना कायद्याचे भय वाटेल.

पनवेलमध्ये रविवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले. यामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्याकरिता स्वतंत्र रॅक व मुद्देमालाकरिता स्वतंत्र क्युआर कोड असल्याने मुद्देमाल तत्काळ एका क्लिकवर उपलब्ध होणार असून मुद्देमालाची ताबा साखळी राखली जाणार आहे. यासह तळोजा पोलीस ठाणे आवारात मध्यवर्ती मुद्देमाल व्यवस्थापन कक्ष वाहने, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांत जप्त वाहने ठेवण्यात येणार आहेत. मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षामुळे तांत्रिक पुराव्याच्या आधारे अपराध सिद्धतेचा दर वाढविण्यासाठी आता फायदा होणार आहे. ही अपराध सिद्धी ब्लॉक चेन या प्रकारात मोडते. यामुळे कोडींग, ट्रॅकिंग आणि ट्रेसिंग तसेच टेम्पर प्रूफ मिळणार आहेत.ही आधुनिक पद्धत आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर केल्यास त्याचा गुणात्मक फायदा होईल.हा अतिशय चांगला उपक्रम असून तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम आहे. अभिलेख कक्ष व मुद्देमाल ठेवण्याची व्यवस्था अतिशय सुसज्ज असल्याने पुरावे व संदर्भ मिळण्यासाठी मदत होणार आहे.

राज्याची एक महत्त्वाची तपास यंत्रणा म्हणून सीआयडीकडे पाहिले जाते. सीआयडीचे मुख्यालय पुण्यात असून त्याचे वेगवेगळे दहा विभाग आहेत. यामध्ये आर्थिक गुन्हे शाखा व भरारी पथक ही नवीन विशेष तपास पथके तयार करण्यात आली आहेत. एखाद्या गुन्ह्याचा स्थानिक पोलिस व इतर तपास यंत्रणांना तपास लागत नसल्यास सरकार अथवा कोर्टाच्या आदेशावरून सीआयडीकडे तपास दिला जातो. सीआयडीकडे किचकट, रखडलेले, वादग्रस्त अशा प्रकारचे गुन्हे तपासासाठी दिलेले असतात. सीआयडीने २०१६मध्ये तपास केलेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण १५.४ टक्के होते. त्यानंतर २०१७मध्ये शिक्षेचे प्रमाण वाढले. या वर्षी आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण २९.४ टक्के झाले. त्यानंतर २०१८मध्ये आरोपींना शिक्षा होण्याच्या प्रमाणात मोठी घट झाली. त्या वर्षी आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण १६ टक्यांवर आले. ऑक्टोबर २०१९मध्ये तर सीआयडीने तपास केलेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण फक्त ५.३ टक्के असल्याचे आढळून आले आहे. सीआयडीने केलेल्या तपासात आरोपींना शिक्षा होण्याचे आतापर्यंतचे सर्वांत कमी प्रमाण असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सीआयडीकडून तपासामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी राहतात का, असा प्रश्नही उपस्थित होत होता. आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी पोलिसांना प्रयत्न करावे लागणार आहेत. अपुरा पुरावा, फितूर साक्षीदार व पंच, पोलीस व सरकारी वकिलांमध्ये समन्वयाचा अभाव या कारणांमुळे अनेक गुन्ह्यांतील आरोपी सुटतात. गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी पोलिसांना आता या मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचा फायदा होणार आहे

केंद्र शासनाने ब्रिटिशकालीन कायद्यामध्ये भारतीय नागरिकांना केंद्रबिंदू मानून गुणात्मक बदल केले. १०० वर्ष जुन्या कायद्यामध्ये तंत्रज्ञानाने होणारे गुन्हे, गुन्हेगारीमध्ये झालेले बदल तसेच इलेक्ट्रॉनिक पुरावे याचा समावेश नव्हता. गुन्हेगारीमध्ये दिवसेंदिवस बदल होत आहेत. या तीन कायद्यात केलेल्या परिवर्तनामुळे इलेक्ट्रॉनिक डिजिटल पुरावे आता ग्राह्य मानण्यात येणार आहेत. डिजिटल पुरावे कुणीही बदलू शकत नाही. भारतीय साक्ष संहितेत याचा समावेश झाल्याने अपराधिक न्याय प्रणालीमध्ये गतिशिलता येऊन अपराध्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढीस लागेल.

आरोप सिद्ध होण्याचे प्रमाण वाढले तरच अपराध्याना कायद्याचे भय वाटेल. मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षामुळे तांत्रिक पुराव्याच्या आधारे अपराध सिद्धतेचा दर वाढविण्यासाठी फायदा होणार आहे. नवी मुंबईमध्ये देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर लॅब उभारण्यात आली आहे. यामुळे कमीत कमी वेळात आर्थिक गुन्हे घडल्यानंतर त्यांना अटकाव करणे शक्य होणार आहे. अत्याधुनिक सायबर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तक्रारीचा तपास केला जाईल, जेणेकरुन गुन्ह्याच्य मुळापर्यंत जाऊन गुन्हा उघड करणे आणि गुन्हा सिद्ध करून शिक्षेचे प्रमाण वाढविण्यास मदत होईल. सायबर गुन्हेगारी ही जगातील सर्वांत मोठी संघटित गुन्हेगारी म्हणून उदयास आली असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या समस्येचा मुकाबला करण्यास या प्रकल्पामुळे मदत होणार आहेतसेच सामान्य माणसाचे वैयक्तिक स्वातंत्र्यला बाधा न आणता सर्वांना न्याय देण्याचे काम या माध्यमातून करण्यात येणार आहे.

राज्य शासनाने अमली पदार्थ विरोधीत प्रभावी पाऊले उचलली आहेत. या संदर्भात झिरो टोलेरन्स पॉलिसी आणली आहे. अमली पदार्थ हे भावी पिढीसाठी घातक आहेत. या अमली पदार्थ विरोधात महाराष्ट्र पोलिसांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या प्रकरणात पोलीस सहभागी अथवा दोषी आढळून आल्यास ३११ खाली त्यास बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगून मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्ष संपूर्ण राज्यात उभारणार असल्याचेही सांगितले आहे. त्याचा परिणाम राज्यातील गुन्हेगारीला आळा बसण्यात होईल यात शंका नाही.

## बदलते तंत्रज्ञान

# एलॉन मस्क लवकरच लाँच करणार नवीन व्हिडीओ ॲप

सुरुवातीला एक्स (ट्विटर) हे फक्त एक मायक्रो-ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म होते, ज्यात तुमची मतं, विचार मांडण्यासाठी काही पोस्ट शेअर केल्या जात होत्या, पण जेव्हापासून



२०२२मध्ये टेस्ला कंपनीचे सर्वेसर्वा एलॉन मस्क यांनी एक्स खरेदी केले आहे तेव्हापासून यामध्ये विविध बदल झाले आहेत. ॲपचा लोगो तर त्यांनी बदलला, पण या बरोबरच व्हिडीओ आणि कॉलिंग तर ऑनलाइन पेमेंटची सुविधा देण्याचेही युजर्सना वचन देण्यात आले आहे. आता एलॉन मस्क हे मास्टर प्लॅनच्या तयारीत आहेत. ते युट्यूब आणि नेटफ्लिक्स, ओटीटी प्लॅटफॉर्मबरोबर स्पर्धा करण्यासाठी काही तरी खास घेऊन येणार आहेत.

एलॉन मस्क स्मार्ट टीव्हीवर व्हिडीओ पाहण्यासाठी एक नवीन सेवा उपलब्ध करून देणार आहेत. युजर्सना एक्स प्लॅटफॉर्मवर नवीन सेवा उपलब्ध होईल. म्हणजेच एक्सवर दिसणारे मोठे व्हिडीओ युजर्स स्मार्ट टीव्हीवर पाहू शकणार आहेत; अगदीच युट्यूब आणि नेटफ्लिक्स व ओटीटी प्लॅटफॉर्मप्रमाणेच.

DogeDesigner नावाच्या एका एक्स युजरने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, 'तुम्ही लवकरच आपल्या आवडत्या द लाँग फॉर्म व्हिडीओला थेट आपल्या स्मार्ट टीव्हीमध्ये पाहू शकाल.' ही पोस्ट रिपोस्ट करत एलॉन मस्क यांनी 'कमिंग सून' असं लिहिलं आहे.

Fortune यांच्या अहवालानुसार एलॉन मस्क यांचे नवीन ॲप युट्यूब टीव्ही ॲपसारखे असेल. हे टीव्ही ॲप प्रथम सॅमसंग आणि मेझॉन स्मार्ट टीव्हीवर उपलब्ध होतील. सर्व युजर्स तसेच कन्टेन्ट क्रिएटर, इन्फ्लुएन्सर, चित्रपटप्रेमी, यांच्यासाठी हा ॲप खास ठरेल, कारण हे ॲप युजर्सना मोठ्या डिस्प्लेवर व्हिडीओ पाहण्यासाठी एक वेगळा अनुभव देईल, असे एलॉन मस्क यांनी सांगितले आहे. यामुळे आता युजर्सना एक नवीन टीव्ही पसुद्धा मिळणार आहे.

एका पोस्टमध्ये एलॉन मस्कने शेअर केले की, एक्सच्या अल्गोरिदममध्ये बदल होणार आहे. युजर्स तुम्ही पिन केलेल्या पोस्ट फक्त ४८ तास पाहू शकाल तसेच काही दिवसांनी इतर युजर्सना तुमच्या अकाउंटमधील फक्त एक पोस्ट दिसेल. त्यामुळे बाकी पोस्ट पाहण्यासाठी तुम्हाला त्यांना फॉलो करावं लागेल. त्यामुळे हे अपडेट तुमच्या अकाउंटचे फॉलोअर्स वाढवण्यासाठी फायदेशीर ठरेल, तर लवकरच इतर व्हिडीओ ॲपला टक्कर देण्यासाठी एलॉन मास्क नवीन टीव्ही व्हिडीओ ॲप घेऊन येत आहेत.

# प्राच्यविद्या संशोधक डॉ. वासुदेव मिराशी



**निमित्त**

डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांची ओळख आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय प्राच्यविद्यासंशोधक व भारतविद्यातज्ज्ञ अशी राहिली आहे. त्यांचा जन्म १३ मार्च १८९६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कुवळे (सध्या जि.सिंधुदुर्ग) येथे मध्यमवर्गीय कुटुंबात विष्णू व राधाबाई या दाम्पत्यापोटी झाला. त्यांचे शिक्षण राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे तसेच पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये झाले. त्यांनी मॅट्रिक (१९१०), बीए (१९१४) आणि एमए (१९१६) या परीक्षांत प्रथमवर्ग पटकाविला. सुरुवातीस त्यांनी मुंबईतील शासकीय एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी एलएल. बी. पदवी प्राप्त केली तसेच मुंबई विद्यापीठात प्रबंध सादर केला (१९२२).

पुढे डॉ. वासुदेव मिराशी यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजात (१९४२-४७; विद्यमान नागपूर महाविद्यालय) व नंतर अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेज (१९४७-५०; विद्यमान विदर्भ महाविद्यालय) येथे संस्कृत या विषयाचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत काम केले. नागपूर विद्यापीठात (आताचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) त्यांनी सन्मान्य व गुणश्री प्राध्यापक म्हणून काम केले (१९५८-६६). काही काळ तेथील पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली. नागपूरमधील विदर्भ संशोधन मंडळ या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. या संस्थेचे ते कार्याध्यक्ष होते. या माध्यमातून त्यांनी इंग्रजीतील संशोधन मराठीत लिहून ते विदर्भ संशोधन मंडळाच्या नियतकालिकातून प्रकाशित केले.

प्राचीन शिलालेख, नाणी आणि अभिजात प्राचीन संस्कृत साहित्य ही त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे. त्यांनी वाकाटकांच्या ताम्रपटांचा आणि शिलालेखांचा मागोवा घेऊन सध्याचे रामटेक म्हणजेच मेघदूतातील रामगिरी होय, असा सिद्धांत मांडला (१९३४). हा सिद्धांत त्यांनी मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक या नावाने प्रकाशित केला (१९५८). खुद्द रामटेकला रामगिरीस्वामींचा उल्लेख असलेला वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिचा शिलालेख एका वाकाटककालीन मंदिरात १९८०च्या दशकात सापडला तो या सिद्धांताला पूरक ठरला. त्याचप्रमाणे अजिंठ्याच्या लेणे क्रमांक १६ येथील वाकाटक लेखाचे वाचन करून नंदिवर्धन (विद्यमान रामटेकजवळील नगरधन) व वत्सगुल्म (विद्यमान वाशिम जिल्ह्याचे ठिकाण) या ठिकाणी वाकाटक राजवंशाच्या दोन शाखा होत्या हे सिद्ध करून त्यांनी वाकाटक वंशावळ निश्चित केली.

शिलालेख व ताम्रपट यांच्या अचूक वाचनाबरोबरच नाणकशास्त्रातही त्यांनी अजोड कामगिरी केली. संस्कृत साहित्यातील त्यांचे विशेष योगदान त्यांच्या कालिदास (१९३४), भवभूती (१९६८), हर्षचरितसार आणि लघुकौमुदी या पुस्तकांतून दिसून होते. याशिवाय त्यांनी संशोधन मुक्तावलिमधून अनेक संशोधनात्मक लेख लिहिले (सर १-९ : १९५४-५९, मराठी).

कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् या ग्रंथमालेचे मिराशी हे पहिले भारतीय संपादक होत. या नियतकालिकेतील परंपरेतूनच त्यांनी प्राचीन राजवंशांवरील ग्रंथ लिहिले. नागपूर येथे त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

**क्लिक...क्लिक...!**




दापोली : कोकणात आजही मुबलक वनसंपदा टिकून आहे. समुद्रकिनारी वसलेल्या गावांना वनराईची छान सोबत असते.

## आरोग्य प्रहर

# उष्णतेच्या लाटेमध्ये काय करावे, काय करु नये!

आपत्ती व्यवस्थापनाच्या परिभाषेत हिट वेव्ह किंवा उष्णतेची लाट ही एक मूक आपत्ती



(सायलेंट डिझास्टर) आहे. सर्वसाधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तपमानापेक्षा वातावरणातील तपमान ३ डिग्री सेल्शियसने जास्त असेल, तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान सलग दोन दिवसांसाठी ४५ डिग्री सेल्शियस पेक्षा जास्त असेल, तर त्या भागात उष्णतेची लाट आली आहे, असे म्हटले जाते.

उष्णतेपासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्या. प्रवासात पाणी सोबत ठेवा. हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरा. उन्हात गॉगल, छत्री, पादत्राणे वापरा. उन्हात जाताना टोपी/हॅटखाली ओलसर कपडा ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत, थंड ठिकाणी ठेवा. कष्टाची कामे सकाळी लवकर किंवा संध्याकाळी ४नंतर करावीत. ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा.

शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळा. कष्टाची कामे उन्हात करु नका. पार्क केलेल्या वाहनात लहान मुलांना ठेवू नका. गडद रंगाचे, तंग कपडे वापरु नका. उन्हाच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. स्वयंपाक घर हवेशीर ठेवा. मद्य , चहा, कॉफी, सॉफ्ट ड्रिंक्स टाळा. खूप प्रथिन युक्त अन्न आणि शिळे अन्न खाऊ नका. विकासाच्या चुकीच्या धारणा, सुखाची अतीव हाव यामुळे आपण पर्यावरणाचा विनाश करत चाललो आहोत. परिणाम म्हणून पृथ्वीचे तापमान वाढते आहे. उष्माघातापासून आपला बचाव करायचा असेल तर आपल्याला स्वतःची काळजीही घ्यायला हवी आणि आपल्या पूर्ण समाजाचे संरक्षण व्हावे या करिताही शाश्वत उपाय योजावे लागतील. शाश्वत विकास म्हणजे काय हे नेमके समजावून घ्यावे लागेल.

जीवाश्म इंधनाचा वापर कमी करणे, अपारंपारिक उर्जा स्त्रोत वापरणे, बांधकाम साहित्यात उष्णता विरोधक साहित्याचा वापर वाढविणे अशा अनेक बाबी आपल्याला दीर्घकालीन उपाययोजना म्हणून अंमलात आणाव्या लागतील. निव्वळ तहान लागली म्हणून विहिर खोदणे फायद्याचे नसले तरी या उन्हाळ्यात थोडे सावध राहून आपण एकमेकांची काळजी घ्यायला हवी.

# डंपरला धडक; दुचाकीस्वार ठार

**महाड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील केंबुर्ली गाव हद्दीत तांत्रिक बिघाड होऊन बंद पडलेल्या एका डंपरला मागून एका मोटरसायकलची धडक बसली. यात मोटरसायकल चालक जागीच ठार झाला.

महेश संजय जाधव (रा.दत्तनगर आदिवासी वाडी माणगाव) हे मंगळवारी त्यांची मोटरसायकल घेऊन महाड ते माणगाव जात होते. या वेळी केंबुर्ली गाव हद्दीत त्यांची मोटरसायकल बंद पडलेल्या डंपरला मागून जोरात धडकली. या अपघातात महेश जाधव याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद महाड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेल महानगरपालिका
## शहर अभियंता विभाग
## ई-निविदा जाहिर

पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२१३/२१३/२०२४ दिनांकः १२/३ /२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | PMC/CE/330/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'क' प्रभाग क्र.१४ मधील भुखंड क्र.०४, सेक्टर -१६, नवीन पनवेल (प) या भूखंडावर पनवेल महानगरपालिकेचे ''स्वराज्य'' मुख्यालय इमारतीचे अंतर्गत सजावट व इतर अनुषंगीक कामे करणे. |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. १५/०३/२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त, I**
**पनवेल महानगरपालिका**

## ताबा नोटीस
### ( स्थावर मिळकतीसाठी )
### ( सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ नुसार)

ज्या अर्थी

मी, श्री.नितीन जीवन पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल बँकेचा चाप्राधिकृत अधिकारी म्हणून, मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ चे नियम ९ नुसार दिनांक. ०९/०६/२०२३ रोजी कर्जदार /मोर्गेजर **श्री. दिलीप बाळू खुटले** यांना मागणीच्या नोटीस नुसार रक्कमरु.२६,७७,५५०/- अधिक ०१/०७/२०२० पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च (अक्षरी रुपये सव्वीस लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे पन्नास रुपये अधिक ०१/०७/२०२० पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च) सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसाचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार / मोर्गेजॉर, आणि जामीनदार यांनी नोटीसीमध्ये मागणी केलेली रक्कम रु.२६,७७,५५०/- अधिक ०१/०७/२०२० पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च (अक्षरी रुपये सव्वीस लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे पन्नास अधिक होणारे व्याज अधिक होणारा खर्च)दिलेल्या मुदतीमध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार / मोर्गे जॉर, आणि जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते कि, खाली सही करणार यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्ती वापरून विशेषतः सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्या खालील नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून , खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा दि.०७/१०/२०२३ रोजी घेतला आहे.

कर्जदार / मोर्गेजॉर,/ गॅरेंटॉर व तमाम जनतेला या नोटीसीद्वारे ताकीद देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील**

| वर्णन | पत्ता | मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या मालकाचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव हद्दीतील मालमत्ता क्र.७५३ | मु. नांदगाव, पो. पळस्पे, ता. पनवेल,जि. रायगड | दिलीप बाळू खुटले | १८५६ स्क्वेअर फूट. |

**परिशिष्ट क्र. १**

पूर्वेस : निखिल खुटले यांचे घर.
पश्चिमेस : विठोबा मंदिर
दक्षिणेस : विनय खुटले यांचे घर.
उत्तरेस : इमारती अर्धवट बांधकाम या स्वरुपात

**स्थळ - पनवेल**
**दि. ०७/१०/२०२३**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-शिवकर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७८/१ | ०-४१-२०<br>पो.ख. ०-००-८०<br>**एकूण - ०-४२-००** | ३.९४ | श्रीमती रमाबाई चंद्रकांत टोपले<br>श्री. अशोक चंद्रकांत टोपले<br>श्री. किशोर चंद्रकांत टोपले<br>श्री. किरण चंद्रकांत टोपले<br>श्रीमती जयश्री महादेव टोपले<br>श्री. राम महादेव टोपले<br>श्रीमती गीता पांडूरंग पाटील<br>श्री. पांडूरंग महादेव टोपले |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १२/०३/२०२४.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१

## ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी
### वेश्वी, ता.उरण, जि. रायगड
### जाहीर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी, ता. उरण, जि. रायगड यांजकडुन सर्व नागरीकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी, हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. तरी इच्छुक अधिकृत व अनुभवी ठेकेदारांनी आपल्या या कामासंबंधीच्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय वेश्वी येथे दिनांक १३/०३/२०२४ ते दिनांक १९/०३/२०२४ रोजी सकाळी १२.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर कराव्यात. या कामांबाबत आलेल्या सर्व निविदा दिनांक २०/०३/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता कार्यालयीन वेळेत उघडल्या जातील. उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी यांनी राखुन ठेवलेला आहे.

| अ. | कामाचे नाव | अंदाजकीय | इसारा रक्कम | कालावधी रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वेश्वी मेन रोड ते जोशी आळी पिण्याची पाईप लाईन टाकणे. | २००००० | २००० | १ वर्ष | ग्रामनिधी |

**अटी/शर्ती**

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल.
२) ग्रामपंचायतीस विनंती केल्यास रु.१०० भरणा करुन अंदाजपत्रक प्रत देण्यात येईल.
३) निविदा फॉर्म फी रोख स्वरुपात भरावी.
४) निविदा किंमत नापरतावा समजावी.
५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेनुसार निविदा स्विकारल्या जातील.
६) निविदा मंजूर केल्यावर ५०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर दोन जामिनदार देऊन करारनामा करावा.
७) मंजुर झालेले काम उरण पंचायत समिती तांत्रीक अधिकारी यांच्या मार्गदर्शना नुसार व ग्रामपंचायतीच्या देखरेखी खाली करावयाचे आहे.
८) तांत्रीक मुल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्धते नुसार देयके आदा केली जातील.
९) काम पुर्ण करण्यापुर्वी पुर्वीच्या कामाच्या ठिकाणाचे फोटो, काम चालु असतानाचे फोटो व काम पुर्ण झाल्यावरचा फोटो दिल्याशिवाय अंतीम बिले दिली जाणार नाहीत.
१०) एकुण देयकामधुन २.३३% आयकर २% GST तसेच अंदाज पत्रका प्रमाणे GST कपात करण्यात येईल. १% कामगार विमा ०.१५% सरचार्ज आवश्यकतेनुसार रॉयल्टी तसेच ५% सुरक्षा अनामत कपात करण्यात येईल.
११) सुरक्षा अनामत रक्कम अंतीम बिलाचे ६ महिन्यानंतर केलेल्या कामाचा दर्जा चांगला असल्याचे तांत्रीक अधिकाऱ्यांच्या दाखल्यानुसार खात्री करुन अदा करण्यात येईल.
१२) सदर कामाचा ठेकेदार अधिकृत (नोंदणीकृत रजि.) आयकर धारक व ऋद्ध धारक असणे आवश्यक आहे.निविदेसोबत पॅनकार्ड आधारकार्ड GST चे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच इतर तत्सम कागदपत्र.
१३) निविदेसोबत बयाणा/ इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने भरावी, रोख स्वरुपात स्विकारली जाणार नाही.
१४) वरील सर्व अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी**
**वेश्वी, ता. उरण, जि. रायगड**

**सही/-**
**ग्रामससेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी**
**वेश्वी, ता. उरण, जि. रायगड**

## ताबा नोटीस
### ( स्थावर मिळकतीसाठी )
### ( सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ नुसार)

ज्या अर्थी

मी, श्री. नितीन जीवन पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल बँकेचा प्राधिकृत अधिकारी म्हणून मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ चे नियम ९ नुसार दिनांक. ०९/०६/२०२३ रोजी कर्जदार / मोर्गेजर **मे रोहित इंटरप्रायजेस प्रो-रोहित गजानन जितेकर** यांना मागणीच्या नोटीसी नुसार रक्कम रु.२३,३२,९९५/- (अक्षरी तेवीस लाख बत्तीस हजार नवशे पंच्याणव रुपये मात्र) अधिक ०१/०६/२०२३ पासून होणारे व्याज आणि खर्च सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसाचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार यांनी नोटीसीमध्ये मागणी केलेली रक्कम दिलेल्या मुदतीमध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते कि, खाली सही करणार यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्ती वापरून विशेषतः सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्या खालील नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून, खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा दि. २७/०९/२०२३ रोजी घेतला आहे.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर व तमाम जनतेला या नोटीसीद्वारे ताकीद देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील**

| वर्णन | पत्ता | मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या मालकाचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| ग्रामपंचायत दापोली हद्दीतील मालमत्ता क्र.४५- २-ब | मु. दापोली, पो. पारगाव, ता. पनवेल,जि. रायगड | रोहित गजानन जितेकर | ५८८ चौ फूट. |

**परिशिष्ट क्र. १**

पूर्वेस : रस्ता आणी मंदिर
पश्चिमेस : महादेव कुडावकर यांचे घर
दक्षिणेस : प्रथेमेश जनरल स्टोअर्स
उत्तरेस : अंकुश जितेकर यांचे घर

**स्थळ - पनवेल**
**दि. २७/०९/२०२३**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

**मा. सैदाणे साहेब**
**अर्जदारातर्फे वकील ॲड. उज्वला तेटगुरे**
**मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे न्यायालयात**
दिवाणी चौकशी अर्ज क. ३५९/२०२४
नि ७/ड

१. श्री धनंजय त्रिंबक टेंभे
२. श्री. परेश त्रिंबक टेंभे
दोघे राहणार: मारुती मंदिराजवळ, वलप,
पो. पडघे, ता. पनवेल, जिल्हा रायगड ......... अर्जदार

**जाहिर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी कै. कुंदा पांडुरंग घरत उर्फ कै. कुंदा रघुनाथ म्हात्रे (पहिल्या विवाहानंतरचे नाव) उर्फ कै. कुंदा त्रिंबक टेंभे (दुसऱ्या विवाहानंतरचे नाव) यांचे दिनांक १०/०५/१९९८ रोजी मौजे वलप, पो. पडघे, ता. पनवेल, जिल्हा रायगड या त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. कै. कुंदा पांडुरंग घरत उर्फ कै. कुंदा रघुनाथ म्हात्रे (पहिल्या विवाहानंतरचे नाव) उर्फ कै. कुंदा त्रिंबक टेंभे (दुसऱ्या विवाहानंतरचे नाव) यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

| गावाचे नाव | युनिट केस क्रमांक | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| ओवळे | २५९ | ४० | २३ | ०.१०.०० | ०.०० |

मयत कै. कुंदा पांडुरंग घरत उर्फ कै. कुंदा रघुनाथ म्हात्रे (पहिल्या विवाहानंतरचे नाव) उर्फ कै. कुंदा त्रिंबक टेंभे (दुसऱ्या विवाहानंतरचे नाव) यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत. याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. कुंदा पांडुरंग घरत उर्फ कै. कुंदा रघुनाथ म्हात्रे (पहिल्या विवाहानंतरचे नाव) उर्फ कै. कुंदा त्रिंबक टेंभे (दुसऱ्या विवाहानंतरचे नाव) यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक १२/०३/२०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
लिपिक
दिवाणी न्यायालय (क स्तर)
पनवेल, जिल्हा रायगड

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
सहा. अधिक्षक दिवाणी
न्यायालय (क स्तर) पनवेल,
जिल्हा रायगड

# दीपाली रोटकर यांना पुरस्कार

**मुरुड :** शहरातील सर एस ए हायस्कूलच्या सहाय्यक शिक्षिका दीपाली राजेंद्र रोटकर हे या विद्यालयात २००६पासून कार्यरत असून मराठी हा विषय उत्तम पद्धतीने शिकवून उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम राखली आहे. त्यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेतर्फे घेण्यात येऊन त्यांच्या या शैक्षणिक क्षेत्रातील अतुलनीय कामगीरी लक्षात घेऊन त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी भारतीय विद्या संकुलाचे अध्यक्ष किशोर जैन व माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र म्हात्रे यांच्या हस्ते रोटकर यांना सन्मानित करण्यात आले.

सन्मानाबद्दल रोटकर यांचे जंजिरा विद्या मंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, मुख्याध्यापक सरोज राणे, सर्व संचालक मंडळ शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**लवाद, नगर रचना परियोजना क्र. ७**
**(देवद (भाग), विचुंबे (भाग),उसार्ली खुर्द (भाग),कोळखे पेठ (भाग), शिवकर (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड) यांचे कार्यालय**
**क्रमांक लवाद/नरयो-७/साधारण/२०२४/**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे उक्त अधिनियम असे संबोधिले आहे.) चे कलम ६८ (२) मधील तरतुदीनुसार प्रारूप नगर रचना परियोजना नैना क्र. ७ ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांचेकडील अधिसुचना क्रमांक सिडको/ नैना/टीपीएस- ७/प्रा.यो./ २०२२ दिनांक- २१ ऑक्टोबर २०२२ प्रमाणे मंजूर केली आहे व सदर योजनेला अंतिम स्वरूप देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ७२ मधील तरतुदीनुसार निम्नस्वाक्षरीकार यांची लवाद म्हणून दिनांक - ०२/१२/२०२२ खालील अधिसुचना क्र. टीपीएस-७ /१२२२ /२१५२/ प्र. क्र.१४८/२२/नवि १२ अन्वये नियुक्ती केली आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ७२ (३) अन्वये मंजुर प्रारूप नगर रचना परियोजना नैना क्र. ७ ची प्राथमिक योजना व अंतिम योजना मध्ये उपविभागणी करण्यात आली होती. निम्नस्वाक्षरीकार यांनी उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट कलम (७) प्रमाणे तसेच महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) प्रमाणे प्राथमिक नगर रचना परियोजना नैना क्र. ७ ही दिनांक ३०/११/२०२३ रोजी तयार केलेली आहे व त्याबाबतची जाहिर सूचना दिनांक ०१/१२/२०२३ रोजीच्या शासन राजपत्र व दिनांक १२/१२/२०२३ रोजीच्या दैनिक रामप्रहर व न्युज बँड मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. व दिनांक २९/१२/२०२३ रोजी शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आली आहे.

निम्नस्वाक्षरीकार यांनी आता अंतिम नगर रचना परियोजना क्र. ७ तयार करणेची कार्यवाही सुरू केलेली आहे. तरी प्राथमिक परियोजना नैना क्र. ७ मध्ये ज्या भूखंडधारकाचे अधिकृत बांधकाम बाधित होत असेल त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत त्याबाबतची संपूर्ण माहिती जसे जिल्हाधिकारी, रायगड/सिडको यांचे मंजूर विकास परवानगीचे आदेश, मंजुर बांधकाम नकाशे इत्यादी सादर करून याबाबत नुकसान भरपाईसाठी बांधकाम मूल्यांकन अहवालासह सविस्तर प्रस्ताव सादर करावे.

दिनांक : ०६/०३/२०२४
पत्ता: नैना कार्यालय, टॉवर नं.१०, आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सी.बी.डी. बेलापूर- नवी मुंबई -४०० ६१४

**(अभिराज गिरकर)**
**लवाद,**
**नैना नगर रचना परियोजना क्र. ७,**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/६८०/२०२३-२४

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**

### ई निविदा सूचना क्र. १४६/२०२३-२०२४ (मुंबई) करीता

दिनांक २१/०२/२०२४ रोजी दैनिक प्रहार, मुंबई,दैनिक मिड डे, मुंबई,दैनिक जागरूक टाईम्स, मुंबई,दैनिक खबरें आजतक, मुंबई,दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | रानसई पाणीपुरवठा योजना.. म.औ.वि. महामंडळाच्या रानसई उप विभाग, पनवेल अंतर्गत भंगार साहित्याचा लिलाव करणे, कळंबोली जंक्शन ते उरण फाटा दरम्यानची जुन्या मृदु पोलादी, सी.आय. जलवाहिन्या, स्पेशल्स "जसे आहे जेथे आहे" या तत्वावर काढणे व पनवेल व तळोजा येथील भांडारगृहात आणणे. | ₹ ०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २६/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# पनवेलमध्ये सराईत गुन्हेगारावर कारवाई

## रेल्वे स्टेशन परिसरातून घेतले ताब्यात; गुन्हा उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात गेल्या काही दिवसापासून तेथून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना धमकावणे, जबरी चोरी, मारहाण करणे आदींच्या गुन्ह्यात वाढ झाली होती. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी धडक मोहीम सुरू केली असून या अंतर्गत एका सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेऊन त्याच्याकडून गुन्हा उघडकीस करण्यात आला आहे.



पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत रेल्वे स्टेशन परिसरात जेवण झाल्यानंतर फिरत असताना फिर्यादी यांचा मोबाईल फोन, वॉलेट अज्ञात व्यक्तीने जबरीने चोरी केल्याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक गुन्हे अंजुम बागवान, उपनिरीक्षक अभय शिंदे, हवालदार अविनाश गंथडे, यशवंत झाजम, सूर्यकांत कुडावकर, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, नाईक प्रवीण मेथे आदींच्या पथकाने गुप्त बातमीदाराद्वारे व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेतला.

यानुसार हा गुन्हा अभिलेखावरील आरोपी सूरज उर्फ बाबू गोविंद वाघमारे (वय २८, रा. नवनाथ नगर झोपडपट्टी, रेल्वे स्टेशन जवळ, पनवेल) याने केले असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने या आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले असता त्याच्याकडून गुन्हा उघडकीस आणला आहे. यापूर्वीसुद्धा त्याने अशा प्रकारचे गुन्हे त्या परिसरात केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

> **रेल्वे स्टेशन परिसरात काही सराईत गुन्हेगार रात्री रेल्वे प्रवास करून येणाऱ्या प्रवाशांना लुटमार व मोबाईल चोरण्याचे प्रकार करीत आहेत. अशा सराईत गुन्हेगारांवर धडक मोहीम सुरू केली असून कडक कारवाईचे धोरण अवलंबविले जाणार आहे.**
>
> **-नितीन ठाकरे, वपोनि**

# पर्यावरण सेवा योजनेंतर्गत पनवेल मनपातर्फे व्याख्यान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय, स्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शासन निर्णयाद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल अॅण्ड ज्यु.कॉलेजमध्ये महापालिकेच्या वतीने पर्यावरण विषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवा योजना महापालिकेच्या वतीने पालिका कार्यक्षेत्रातील २५ माध्यमिक विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेची माहिती देण्यासाठी नुकतीच या २५ माध्यमिक शाळांच्या प्रतिनिधींची बैठक उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात घेण्यात आली होती. या पर्यावरण सेवा योजनेंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये पर्यावरण सेवा योजनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले. तसेच 'जल' या विषयावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पाण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. या वेळी लोकनेते रामशेठ इंग्लिश मिडीयम स्कूल अॅण्ड ज्यु.कॉलेजचे प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, पर्यवेक्षक सारिका लांजूडकर, समन्वयक सोनल मुंबईकर, जयेश मोकल तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच पध्दतीने महापालिकेच्या वतीने विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

## निवडक



### गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**मोहोपाडा :** हिज ग्रेस मार्टिन मोर अप्रेम, एपिस्कोपा यांच्या मार्गदर्शनाने सेंट जोसेफ बिलीव्हर्स ईस्टर्न चर्च कुटुंबाने संस्थापक मोरन मोर अथेनासियस योहान मेट्रोपॉलिटन यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा केला. या वेळी डायोसीज टीम फादर संकेत मसिह, फादर टिमोथी रॉड्रिग्ज, फादर प्रभाकर भांबळ आणि टीमने १०० हून अधिक फूड पॅकेट्सचे वाटप करून आपल्या प्रेम आणि चिंता व्यक्त केली. त्याचबरोबर गरजूंना कोरडे रेशन आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. या वेळी पनवेल रेल्वे स्टेशन, मुंबई-पुणे जुना महामार्ग आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

### महिलांचे कविसंमेलन उत्साहात



**नवी मुंबई :** ध्यास कवितेचा काव्य मंच मुंबई आणि डॉ. राजेश मढवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अक्षर चळवळ प्रकाशन यांच्या सौजन्याने 'थोडं तिच्या मनातलं' या विषयावर निमंत्रित कवयित्रीचे कविसंमेलन ध्यासचे अध्यक्ष प्रसिद्ध कवी संदेश भोईर यांच्या संकल्पनेतून मराठी ग्रंथसंग्रहालय, गोखले रोड येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात एकूण तीस कवयित्री निमंत्रित केल्या होत्या. या वेळी नमिता कीर, स्नेहाराणी गायकवाड, सुनीता काटकर, माधुरी बागडे, स्वाती शिवचरण, संध्या लगड, रजनी निकाळजे, ऋतुजा गवस, अक्षता गोसावी, दीपा ठाणेकर, सुप्रिया हळबे, भारती वार्डेकर, प्रतिभा मढवी, शिल्पा परुळेकर आदींनी कविता सादर केल्या.

### नाईक महाविद्यालयात महिला दिन



**नवी मुंबई :** कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाचे एफ.जी. नाईक महाविद्यालयात महिला विकास कक्ष अंतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनींसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन प्रमुख अतिथी सहाय्यक पोलीस आयुक्त नौपाडा विभाग, ठाणे शहर प्रिया ढाकणे डमाळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एफ.जी. नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, सायली वायगडे, कला शाखा विभाग प्रमुख डॉ दत्तात्रय घोडके महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. स्मृतिगंधा बिडकर, प्रा. जयश्री दहाट, प्रा. प्राजक्ता पाटील, प्रा. योगिता पाटील, ग्रंथपाल जयश्री मोरे, प्रा. सीमा शिंदे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

### वाशी गाव येथे महाशिवरात्री उत्सव

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील प्राचीन मंदिरांपैकी वाशीगांव येथील जागृतेश्वर शिव मंदिराचा नावलौकीक असून, अनेक वर्षांपासून परंपरेनुसार वाशी गाव ग्रामस्थ मोठ्या भक्तीभावाने व एकोप्याने या ठिकाणी विविध धार्मिक उत्सव साजरे करीत आहेत. त्यापैकीच महाशिवरात्री धार्मिक उत्सव भाजप नेते दशरथ भगत यांच्या सहकार्याने झाला. या सप्ताह काळात प्रतिदिन वाशीगावातील दानशूर नागरिक यांच्या वतीने अन्नदान रुपी सेवा महाप्रसादाच्या रूपाने करण्यात आले. दिवसभरात २० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# सिंधुदुर्ग रहिवासी संघातर्फे कर्करोग चाचणी व मार्गदर्शन



**पनवेल : प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ, रुधिरसेतु सेवा संस्था आणि राजस्थानी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भाशयाचा कर्करोग यासंबंधी माहिती आणि मोफत VIA चाचणी शिबिर झाले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवीन पनवेल सेक्टर २ येथील गव्हर्नमेंट सर्व्हंट सोसायटी हॉल येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामधे एकशे दहा महिलांनी सहभाग घेऊन आरोग्य चाचणी करून घेतली.

या शिबिरामधे कॅन्सर तज्ञ डॉ. निहारिका गरच आणि डॉ. रेखा थोटे यांनी ब्रेस्ट कॅन्सर आणि गर्भाशय कॅन्सर वरती मार्गदर्शन केले. सिंधुदुर्ग संघाच्या उपाध्यक्ष प्रिया खोबरेकर, प्रिता भोजने, धनश्री धुरी, श्रद्धा माधव, योगिता येरम, कल्पना राणे, अंकिता पालव, अर्चना तावडे, वैभवी मराळ, रसिका चव्हाण, या महिला कार्यकर्त्यांसह संघाचे अध्यक्ष केशव राणे, सचिव रामचंद्र मोचेमाडकर, भाई परब, दीपक तावडे, प्रदीप रावले, वासुदेव सावंत, मनोहर मराळ, प्रसन्नकुमार घागरे, बाबाजी नेरुरकर, प्रशांत खोबरेकर, संतोष नेरुरकर यांनी शिबिरासाठी मेहनत घेतली.

रुधिरसेतु सेवा संस्थाचे डॉ. नरेंद्र दसरे, उन्मेष लोहार, सुरेश रिसबूड, राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनंदा कोठारी, उपाध्यक्षा मनीषा बोहरा यांनी शिबिरासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्यासाठी हातभार लावू, असे सांगितले.



**रसायनी : आपटा गावातील मोठ्या तलावाची दुरवस्था झाल्याने याची डागडुजी करण्याची मागणी येथील ग्रामस्थ करीत आहेत. साफसफाई, गाळ काढणे, कठडे बसविणे, शेवाळ साफ करणे अशी कामे संबंधित प्रशासनाने वेळीच हाती घ्यावी, असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)

# नवी मुंबईत स्वच्छता योद्धा संकल्पना राबविणार

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छता कार्यात युवकांचा सहभाग वाढीच्या दृष्टीने महाविद्यालयातील एनएसएस मधील विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्यात येत आहे, असे सांगत नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी स्वच्छता योध्दा ही संकल्पना मांडली. या संकल्पनेअंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये स्वच्छता कार्यात उल्लेखनीय सक्रिय सहभाग देणाऱ्या महाविदयालयांच्या एनएसएस पथकांना स्वच्छता योध्दा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध महाविदयालयांच्या एनएसएस पथकांच्या सहयोगाने विष्णुदास भावे नाटयगृहात संपन्न झालेल्या स्वच्छता योध्दा २०२४ उपक्रमाप्रसंगी नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या शुभहस्ते स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये स्वच्छता कार्यात सक्रिय सहभागी होणाऱ्या ३५ महाविद्यालयांच्या एनएसएस पथकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे, शहर अभियंता संजय देसाई, उपायुक्त मंगला माळवे, एनएसएसचे जिल्हा समन्वयक नितीन देशमुख, सह जिल्हा समन्वयक प्रणिता भाले व सुनिता पाल उपस्थित होते.

या वेळी बोलताना अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी स्वच्छता कार्यात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या एनएसएस विद्यार्थ्यांच्या शिस्तबध्द सहयोगाचा विशेष उल्लेख केला. त्याचप्रमाणे माझी वसुंधरा अभियानातही शहराचे मानांकन उंचावण्यासाठी कटिबध्द रहात प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर व समुहाने माझी वसुंधरा अभियानाची डिजीटल शपथ घ्यावी आणि आपल्या नवी मुंबईचा नावलौकिक उंचवावा, असे आवाहन त्यांनी केले. उपस्थितांसमवेत त्यांनी वसुंधरेची सामुहिक शपथ ग्रहण केली.

यावेळी आरंभ क्रिएशन्सच्या युवा कलावंतांनी सादर केलेल्या माझे शहर माझी जबाबदारी या पथनाटयाला उपस्थितांनी उत्तम दाद दिली. त्याचप्रमाणे ओलू, सुकू व घातकू या तिन्ही कचरा वर्गीकरणाच्या चित्रफितींना तसेच त्यावरील मॅस्कॉटलादेखील उपस्थितांनी कौतुकाची दाद दिली.

स्वच्छता योध्दा या अभिनव उपक्रमातून सेवाभावी वृत्तीने समाजपयोगी कार्यासाठी कृतीशील असणाऱ्या एनएसएस विदयार्थ्यांचा व्यापक सहभाग स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत घेतला जाणार असून या माध्यमातून शहरात स्वच्छतेची व्यापक चळवळ युवकांच्या साथीने उभारली जात आहे.

# महिला दिनानिमित्त योग मंत्र



**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल, इंग्रजी माध्यम, माध्यमिक विभागात शनिवारी (दि. ९) आरोग्याचा योग मंत्र देण्यात आला. या वेळी माजी विद्यार्थिनी, माजी विद्यार्थ्यांचे माता-पालक, विद्यालयातील विद्यार्थिनी प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचे माता पालक तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक वृंद, पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

विद्यालयातील इंग्रजी माध्यमातील माध्यमिक विभागाच्या क्रीडा शिक्षिका वैभवी मराळ यांनी मंत्रोच्चार, ओंकार, योगासने व सूर्यनमस्कार या चतु:सूत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थित सर्व महिलांना आरोग्याचा योगमंत्र दिला. महिला दिनाचे औचित्य साधून महिला पालकांना व माजी विद्यार्थिनींना योगाचे आणि प्राणायाम क्रियांचे महत्त्व पीपीटीच्या माध्यमातून पटवून देण्यात आले तसेच प्रात्यक्षिकातून विविध आसने व सूर्यनमस्कार सर्व महिलांनी शिक्षकांसोबत उत्साहाने केले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा महाजन यांनी क्रीडा शिक्षकांचे कौतुक केले.

# महिला दिनानिमित्त रक्तदान शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेल इलाईट, आम्ही रक्तदाते पनवेलचे, श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, पुज्य सिंधी पंचायत ट्रस्ट आणि दिलासा फाऊंडेशन यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला पनवेलकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला

शहरातील पूज्य सिंधी पंचायत हॉल मध्ये थेंब आहे रक्ताचा, आधार दुसऱ्याच्या जीवनाचा या शीर्षकाखाली रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला अनेक मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे तरुण वर्गाने उपस्थित राहून रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात ५० जणांनी रक्तदान केले. त्यांना प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन आयोजकांतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. हे रक्तदान शिबिर एमजीएम हॉस्पिटल कामोठे यांच्या माध्यमातून झाले.

# कळंबोलीतील मएसो शाळा प्रांगणात विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरला

**पनवेल : वार्ताहर**

रोजच्या अभ्यासा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान कुठेतरी उपलब्ध व्हावे व त्यातून पैशाची लेन देन करत व्यवहार करता यावा व तो समजावा दैनंदिन जीवनातील कामकाज कसे चालते एखाद्या वस्तूची देवाणघेवाण पण त्यातून नफा तोटा कसा ओळखावा. या स्तुत्य उपक्रमाने कळंबोलीतील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतील विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार नुकताच राबविण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांसह पालकांनी व शिक्षकवर्गांनी मोठा सहभाग नोंदवला.

या आठवडा बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी लहान लहान स्टॉल मैदानावर आखून लिंबू, मिरची, कणीस, फळ, भाज्या, खाऊ, फळे, पालेभाज्या अशा प्रकारचे विविध वस्तू बाजारात विक्रीसाठी ठेवल्या होत्या व ग्राहकांना बोलावत हे विद्याथी आपल्या दुकानाकडे आकर्षित करत होते.

या उपक्रमाचे पालक वर्गाकडून कौतुक करण्यात आले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या विद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थी यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन करत अशा प्रकारचे विविध उपक्रम स्पर्धा आयोजित केल्या जातात विद्यार्थ्यांचा पार पडलेला आठवडा बाजार हा विद्यार्थ्यांच्या व्यवहारिक ज्ञानात बदल घडवणारा असल्याचे या शाळेतील शिक्षक नमिता म्हात्रे यांनी सांगितले.





## निवडक

### प्रतीक पेडणेकर यांचा सत्कार



**मुरूड :** श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथील सहाय्यक शिक्षक प्रतीक रमेश पेडणेकर यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेतर्फे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. याचे औचित्य साधून नांदगाव हायस्कूल येथील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांच्या वतीने पेडणेकर यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षिका अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, शिक्षक केत्तर प्रतिनिधी संतोष बुल्लू, योगेश पाटील, दत्ता खुलपे, वरिष्ठ लेखनिक मंगेश नांदगावकर, रवींद भोई, सागर राऊत, योगेश पाटील, राहिल घलटे आदी उपस्थित होते.

### महादेव खुळपे यांना पुरस्कार



**मुरूड :** रायगड जिल्हा परिषदेची कळसांबडे प्राथमिक शाळेतील पदोउन्नती मुख्याध्यापक महादेव शिवाजी खुळपे यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेतर्फे शैक्षणिक कारकिर्दीबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. खुळपे यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी ज्ञानरचना वाद उपक्रमात शाळेचा नावलौकिक केला तसेच तळा तालुक्यातील पहिली इंटर ॲक्टिव्ह शाळा निर्माण करून बहुमान मिळून दिला. सामाजिक व शैक्षणिक कार्यातसुद्धा त्यांनी काम केल्याने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या वेळी त्यांचे गटशिक्षण अधिकारी, केंद्र प्रमुख, शिक्षक सहकारी अभिनंदन केले.

# कोलाड येथे नाना नानी पार्कच्या सुशोभीकरण व दुरुस्तीचे भूमिपूजन



**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पाटबंधारे अंतर्गत कोलाड येथील विभागीय वसाहतीमधील नाना नानी पार्कच्या सुशोभीकरण व दुरुस्तीचे भूमिपूजन राज्याच्या कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, रायगड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद पवार, उपकार्यकारी अभियंता अतुल आगवणे, सरपंच शर्मिला सागवेकर यांच्यासह पाटबंधारे विभागाचे अधिकारी, नागरिक उपस्थित होते. सन २०१५पासून या नाना नानी पार्कची पाटबंधारे विभागांतर्गतकोणत्याही प्रकारची देखभाल-दुरुस्ती करण्यात आलेली नव्हती. जिल्ह्यातील पर्यटनाच्या दृष्टीने पाटबंधारे विभागाच्या वतीने सुशोभीकरण करण्यात येणार असून यामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे तसेच उद्यानाचे प्रवेशद्वार सुशोभीकरण, अल्पोहार बैठक व्यवस्था, उद्यानामध्ये लॉन तयार करणे यामध्ये सुक्ष्म सिंचन व्यवस्था, रंगकाम, डागडुजी, लहान मुलांना खेळण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

# कर्जतमधील १८ गावे, ६० वाड्यांवर पाणीटंचाईचे संकट

## टँकरद्वारे पुरवठा करण्यासाठी निधीची तरतूद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील १८ गावे आणि ६० आदिवासीवाड्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई उद्‌भवणार आहे. या वर्षी पाणीटंचाई अधिक जाणवणार असल्याचे दिसून येत आहे. टंचाई निर्माण झाल्यावर टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने ३९ लाख ५० हजारांच्या निधीची तरतूद केली आहे.

कर्जत हा आदिवासीबहुल तालुका असून दुर्गम भागात वसलेल्या या तालुक्यातील उल्हास व पेज नदीवगळता अन्य नद्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात. त्यामुळे दरवर्षी मार्च महिना सुरू झाला की पाणीटंचाई जाणवते. तालुक्यातील पाणीटंचाई निवारण्यासाठी शासनाकडून पाणीटंचाई कृती आरखडा तयार करण्यात येतो. त्या आराखड्यानुसार पाणीटंचाई निवारणासाठी विंधण विहिरी खोदणे, विहिरींची दुरुस्ती करणे आणि टँकरने पाणीपुरवठा करणे आदी कामे केली जातात. यंदा तालुक्यात १८ गावे आणि ६० आदिवासी वाड्यांमध्ये पाणीटंचाई असून तेथे बैलगाडी तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जाणार आहे. या आराखड्यात एक कोटी ५३ लाख रुपये खर्च करण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आला आहे. १९ गावांतील नळपाणी योजना आणि तेथील पाण्याची उपलबधता लक्षात घेऊन या सर्व गावांचा समावेश पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये करण्यात आला आहे, तर ६० वाड्यांमध्येही आराखड्याच्या माध्यमातून पाणीटंचाई दूर केली जाणार आहे.

# जिल्ह्यातील तृणधान्याचे क्षेत्र वाढविण्यावर भर देणार -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

बदलत्या काळात सुदृढ आरोग्यासाठी आहारात तृणधान्यांचा वापर वाढवण्यासाठी जिल्ह्यात चांगले काम सुरू आहे. तृणधान्याखालील क्षेत्र हे आगामी दोन वर्षांत पाच हजार हेक्टर होण्यासाठी कृषी विभाग, जिल्हा प्रशासन आणि शेतकरी यांच्या सहकार्याने विशेष भर देण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

कृषी विभागाच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान पौष्टिक तृणधान्य अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जिल्हाधिकारी बोलत होते.



व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले, आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, समन्वय अधिकारी स्मार्ट प्रकल्प सतीश बोऱ्हाडे, कृषी विकास अधिकारी मिलिंद चौधरी, उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर, प्रकल्प उपसंचालक आत्मा भांडवलकर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, संयुक्त राष्ट्र संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागणीनुसार २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय मिलेट वर्ष म्हणून जाहीर केले आहे. या अंतर्गत तृणधान्याचे उत्पादन वाढविणे, त्याच्या पदार्थांचे आहारातील प्रमाण वाढविणे यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तृणधान्याच्या वापर व उत्पादन वाढीसाठी रायगड जिल्ह्यात विविध कार्यक्रम घेण्यात आले तसेच विविध माध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे. या वर्षभरात राबविलेल्या कार्यक्रमांमुळे तृणधान्याचे आहारातील प्रमाण वाढले आहे तसेच मोठ्या प्रमाणात तृणधान्यावरील प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे उत्पादन वाढले आहे. महाराष्ट्र हे स्टार्टअप हब आहे. राज्यात नवनवीन उद्योजक तयार होत आहेत. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित उद्योग सुरू करावेत तसेच शेतीमध्ये आधुनिक पद्धतीचा वापर केला पाहिजे. पारंपरिक शेती पद्धतीमध्ये परिवर्तन करण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करूया असे सांगून जिल्हाधिकारी जावळे यांनी कृषी विभागाला सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले.या वेळी कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांनी तृणधान्यविषयी जागृती करण्यासाठी तसेच मागील आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

समन्वय अधिकारी स्मार्ट प्रकल्प, सतीश बोऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या निमित्ताने तृणधान्यांपासून बनविलेल्या पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलला जिल्हाधिकारी जावळे यांनी भेट दिली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. या वेळी जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले तसेच कृषी विभागाच्या योजनांची माहिती, तृणधान्यांपासून विविध पाककृती माहिती देणाऱ्या पुस्तिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

# चौक ग्रामपंचायतीतर्फे महिलांसाठी विविध कार्यक्रम



**चौक : प्रतिनिधी**

प्रत्येक स्त्री ही संसाराचा पाया आणि कळस असल्याने सर्वप्रथम त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. चौक ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांचे कौतुक आहे, असे प्रतिपादन खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले. चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच रितु सुधीर ठोंबरे आणि ग्रामपंचायत यांनी महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित केले होते. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाला भाजपचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, ग्रामविकास अधिकारी एस.पी.जाधव, उपसरपंच राजन गावडे, सुभाष पवार, निखिल मालुसरे यांच्यासह महिला सदस्य प्राची दबके, लक्ष्मी वाघ, विधितज्ञ रीना सोनटक्के, नयना झिंगे, पूजा हातमोडे, सुवर्णा राणे, ऋषाली पोळेकर, अश्विनी म्हात्रे, स्वाती देशमुख, कार्यालयीन अधीक्षक सुनीता मालुसरे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

माझी वसुंधरा, शून्य कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक निर्मूलन यावर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले गेले होते, तर सायंकाळी खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम इर्शाळवाडी कॅम्प येथे सुमेधा निम्हण यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमात साक्षी संजय शिंदे यांनी पैठणी जिंकण्याचा मान मिळवला, तर लकी ड्रॉ विजेत्या चंद्रा भाऊ पारधी या ठरल्या.

# बचत गटांच्या महिलांचा मेळावा

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त राजमाता जिजाऊ फाउंडेशनच्या वतीने ॲड. पूजा सुर्वे यांनी पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व बचत गटांच्या माहिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात ७६ महिलांनी सहभाग घेत प्रतिसाद दिला.

बचत गटातील उपस्थित महिलांना लेखिका मृदुला गडनीस यांनी मार्गदर्शन केले. या वेळी महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सूत्रसंचालन लीना कोशे यांनी केले. या मेळाव्यास प्रताप सुर्वे, श्रीरंग दरेकर, काशिनाथ पवार, सदा आहेर, प्रतिक सुर्वे, सुदाम आव्हाड, राहुल निगुडकर, उदय दरेकर आदी उपस्थित होते.

# खालापूर ताकई येथे हळदीकुंकू समारंभ उत्साहात



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील ताकई येथे एस.पी. मैदानावर भव्य हळदीकुंकू समारंभ पार पडला. जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित या समारंभात मोठ्या प्रमाणात खोपोली शहर आणि खालापूर तालुक्यातील महिलावर्ग उपस्थित होता.

सुधाकर घारे फाउंडेशन खालापूर तालुका आणि खोपोली शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून वरदा सुनील तटकरे आणि राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या वेळी राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी महाराष्ट्र सरकार राबवत असलेल्या महिला धोरणांची माहिती दिली. आता इथुन पुढे वडिलांच्या नावासोबत आईचे नाव लावण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याचे त्यांनी सांगितले.

सुधाकर घारे यांनी सर्व महिलांचे स्वागत करीत महिलांचा सन्मान आणि सहभाग या धोरणानेच आपण काम करीत असल्याचे सांगितले.

हळदीकुंकूच्या कार्यक्रमास मराठी विश्वातील अनेक महिला कलाकार उपस्थित होत्या. यामध्ये तुझ्यात जीव रंगला मालिकेतील अक्षया देवधर, खुलता खळी खुलेना मालिकेतील अभिज्ञा भावे, टिपक्यांची रांगोळीमधील नम्रता प्रधान, नृत्यांगना राधा पाटील यांचा समावेश होता. या वेळी सेलेब्रेटींनी सर्वांचे मनोरंजन करीत नृत्य सादर केले आणि महिलांशी संवादही साधला.

आरजे अक्षयने आपल्या विनोदी शैलीत सूत्रसंचलन केले. महिलांनी विविध बक्षिसे आणि पैठणी जिंकत कार्यक्रमाचा समारोप झाला.

# भविष्याच्या सुरक्षिततेसाठी करूया पाण्याची बचत...!

स्वच्छ व पुरेसे पाणी मिळणे हा ज्याप्रमाणे प्रत्येकाचा मुलभूत अधिकार आहे. त्याचप्रमाणे पाणी अडविणे व मुरविणे व पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा नियोजन पूर्वक वापर करणे हेसुद्धा प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे. विकसनशील देशातील सुमारे ८० टक्के आजार हे दूषित पाण्याशी संबधित आहेत. ७० टक्के गोड्या पाण्याचा वापर हा शेतीसाठी करीत असल्याने ग्रामीण आणि शहरी भागातील पाणी वापराचे प्राधान्यक्रम परस्परविरुद्ध बनत आहेत. पाण्याशिवाय शास्वत विकास करणे, गरिबी आणि रोगराई यांचे निर्मूलन करणे शक्य होणार नाही. या अनुषंगाने सजीव सृष्टीच्या उत्कर्षासाठी पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. म्हणून पाणी बचत, पाण्याचे जतन व संवर्धन आणि पाण्याचा काटकसरीने वापर, जल साक्षरता, विहीर, बोअर भूजल पुनर्भरण ही पंचसूत्री महत्त्वाची आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने २०५० या वर्षासाठीची ४२ उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत त्यामधील पाण्याची कमतरता आणि जलप्रदूषण दूर करणे या उद्दिष्टाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. यामध्ये जलसाक्षर समाजच महत्वाची भूमिका बजावू शकतो. आपण सर्वांनी पाणी बचतीसाठी फक्त वाचून, ऐकून, चर्चा करून थांबणे इष्ट नाही, तर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्यास बरेच क्रांतिकारी कार्य घडेल व सजीव सृष्टीचे भविष्य सुरक्षित राहील. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असून पाण्याचा जपून वापर करण्यासाठी कटीबद्ध होऊ या. जल संवर्धनासाठी पुढील उपक्रम करूया.

**पावसाचे पाणी साठवणे :** पावसाचे जे पाणी घराच्या छतावर, अंगणात, रस्त्यावर अश्या विविध ठिकाणी पडते व वाहून जाते तेच पाणी अडवून जमिनीत साठवावे लागेल. जलस्त्रोतावर अतिक्रमण नको. जलस्त्रोतावर अतिक्रमण करणे व पाण्याचे शोषण व प्रदूषण करतात त्यावर प्रतिबंध हवा. पाण्याचा प्रवाहाचा वेग कमी करावा, पावसाच्या पाण्याचा प्रवाहाचा वेग कमी करावा. अशाने दुष्काळ रोखता येईल. शिवाय पूरदेखील येणार नाहीत. डोंगरमाथ्यावर समतल चारी खोदणे आवश्यक आहे.

**जलाशयांची निर्मिती आवश्यक :** आपले शेतकरी असलेले पूर्वज आणि राज्यकर्ते यांनी विविध हेतूसाठी वेगवेगळ्या प्रकारचे जलाशय बांधले आहेत त्यामध्ये लहान, उथळ विहिरी, खोल विहीरी, पुष्करणी, तळी आणि धरणे यांचा समावेश होता. नदी, विहिरी, तलावातील गाळ काढणे.

**पाणलोट क्षेत्राची निर्मिती :** माथा ते पायथा या तत्वानुसार लोकसहभागातून पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन करणे आवश्यक.

**पाणी संवर्धन नियोजन, वनराई बंधारे निर्मिती. :** पाण्याचे नियोजन, व्यवस्थापन,संवर्धन करणारी व्यवस्था उदा.मृदा संवर्धन,कुरण विकास,वृक्ष लागवडीचा कार्यक्रम,तसेच कमी पाण्यात येणारी पिके घेणे आवश्यक आहे.

**पाणी पुनर्वापरावर भर :** पाणी वापरताना तीन आर चा वापर करा. रिड्यूस, रियूज आणि रिसायकल म्हणजेच पाण्याचा वापर शक्य तितका कमी करा. पाण्याचा पुन्हा पुन्हा वापर करा. पाणीपुनर्वापरावर भर द्यावा.

**पाणी बचतीचे घरगुती सूत्र :** कपडे धूत असताना पाण्याचा नळ सुरु ठेऊ नका.गाडी स्वच्छ करण्यासाठी बादलीचा वापर करूया. दात घासताना बेसिनचा नळ बंद करावा. अंघोळीसाठी नळ अथवा शॉवरचा वापर करण्यापेक्षा बादलीत पाणी घेऊन अंघोळ केल्यास पाण्याचा कमी वापर होईल.

**-सुरेश पाटील माहिती, शिक्षण व संवादतज्ज्ञ (संकलन जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग)**

# अंध विद्यार्थ्यांची महाडच्या छबिन्यात सहल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड येथील सेवाभावी संवेदना ग्रुपने विरेश्वर महाराजांच्या छबिन्यात सातव्यांदा अंध विद्यार्थ्यांसाठी आनंद निर्माण करण्यासाठी सहल आयोजित करून सेवाभावी वृत्ती जपली.

मंडणगड तालुक्यातील घराडी या गावात स्नेहज्योती अंध विद्यालय आहे. या निवासी विद्यालयात गरीब वर्गातील अंध विद्यार्थ्यांना शालेय तसेच इतर व्यवसायविषयक शिक्षण देण्यात येते. शाळेच्या अध्यक्ष आशा कामत आणि मुख्याध्यापिका प्रतिभा सेनगुप्ता या दोन भगिनी आणि लोकांकडून मिळणाऱ्या देणग्या यावर या शाळेचा डोलारा गेली २० वर्षे उभा आहे.

या शाळेतील अंधविद्यार्थ्यांना महाडमधील संवेदना ग्रुपच्या माध्यमातून या शाळेतील अंध विद्यार्थ्यांना छबिन्यात आणण्याचे सात वर्षांपूर्वी ठरले आणि तेव्हापासून आजपर्यंत हा उपक्रम यशस्वीपणे सुरू आहे. महाडमधील काही संवेदनशील नागरिक एकत्र येऊन या विद्यार्थ्यांचे हंगामी पालकत्व स्वीकारतात आणि त्यांना जत्रेत फिरवून त्यांच्या आनंदाचे साक्षीदार होतात.

यंदा १५ अंध विद्यार्थी व दोन अंध शिक्षकांसह एकूण २३ जण स्नेहज्योती शाळेकडून महाडला छबिन्याच्या जत्रेमध्ये फिरण्यासाठी आले होते. संवेदना ग्रुपतर्फे त्यांची जाण्या-येण्याची, अल्पोपहाराची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर अवर्णनीय आनंद दिसून आला. रम्य आठवणी मनात साठवत त्यांनी निरोप घेतला.



# कबड्डी स्पर्धेत ओढांगी संघ विजेता




**अलिबाग : प्रतिनिधी**

ओमकार क्रीडा मंडळ व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने वेश्वी येथे नुकतीच जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा रंगली. या स्पर्धेत पेण तालुक्यातील वायुसुत ओढांगी संघाने अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी रायवाडी संघाला अटीतटीच्या सामन्यात पराभूत करून विजेतेपद पटकाविले. नागेश्वर आवास आणि दर्यावर्दी बंदर नागाव संघाला तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

जिल्ह्यातील एकूण ३२ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. पांडवादेवी संघाच्या केदार लाल याला उत्कृष्ट चढाईपटू, उत्कृष्ट पकडपटू आवास संघाचा अक्षय कवळे, पब्लिक हिरो नागाव संघाचा मंथन सुर्वे, तर स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून ओढांगी संघाचा जितेश पाटील याला घोषित करण्यात आले.

विजेत्या संघांना व वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना ओमकार क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, गिरीश शेळके, राकेश राऊळ, अमोल नलावडे, अमित मुळूस्कर, प्रशांत राऊळ, वीरेंद्र मगर, प्रसाद मगर, अंकित शेळके, सुशांत नलावडे, पंकज गुरव यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले .

या वेळी जिल्हा निवड चाचणी किशोर गटातील मुले आणि मुली या दुहेरी स्पर्धेत विजेत्या ओमकार वेश्वी संघाचा आणि राज्य व जिल्हा कबड्डी संघात निवड झालेल्या खेळाडूंचा विशेष सत्कार ओमकार क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आला.

# पीएलटी संघ नागोठणे ग्रामीण प्रीमियर लीगचा मानकरी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामीण क्रिकेट असोसिएशन आयोजित ग्रामीण प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा वेलशेत येथील श्री जाखमाता क्रिडांगणावर खेळली गेली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक लहुशेठ तेलंगे व प्रतिक तेलंगे यांच्या पीएलटी इंटरप्राइझेस वांगणी संघाने पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन रोहा पंचायत समितीचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सदानंद गायकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. द्वितीय क्रमांक एकनाथशेठ ठाकूर यांचा शरयू इंटरप्राइझेस वांगणी संघ, तृतीय क्रमांक विशाल म्हात्रे यांचा दैवी प्रिन्स इलेव्हन वरवठणे संघ आणि चतुर्थ क्रमांक प्रल्हादशेठ राणे यांचा निश्चय ११ पीकेआर जीकेआर पाटणसई संघाने मिळविला. मालिकावीर, सामनावीर, सिक्सर किंग व पब्लिक हिरो म्हणून विकास जाधव, उत्कृष्ट फलंदाज ऋतिक माळी, उत्कृष्ट गोलंदाज महेंद्र गायकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक प्रणय राणे, उगवता तारा प्रणय कदम आणि शिस्तबद्ध संघ म्हणून विजय जाधव यांचा व्हीजे एमएनएस बालसई संघास पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यास भाजप नेते किशोर म्हात्रे, शिवसेना उपतालुकाप्रमुख मनोज खांडेकर, लहूशेठ तेलंगे, चंद्रकांत भालेकर, शेखर ठाकूर, प्रमोद जांबेकर, प्रल्हादशेठ राणे, मंदार कोतवाल, बाळासाहेब वाजे, भरत गिजे, चंद्रकांत तेलंगे, अंकुश तेलंगे, विजय जाधव, सुभाष मढवी, शशिकांत शिर्के, नाना शिरसे, सुभाष मढवी, प्रल्हाद राणे आदींसह ग्रामस्थ व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.











